• पंढरपूर • गुरुवार, २ जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - २२२



पंढरपूरच्या निवडणुकातूनही मालकशाही संपुष्ठात आणू : आ. राजाभाऊ खरे PII




'विज्ञान भारती' आणि 'इस्त्रो यांच्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर ... PIII

## नवीन वर्षानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरास

# फळ व फुलांची आकर्षक सजावट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** नववर्षानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध फुलांची व संत्रा फळाची आकर्षक सजावट केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. श्री विठ्ठल गाभारा, श्री रुक्मिणी गाभारा व श्री संत नामदेव पायरी येथे झेंडू, शेवंती, तोरण, कामिनी इत्यादी 300 किलो फुलांचा व 5 हजार नग संत्रा फळांचा वापर करून मनमोहक व आकर्षक सजावट करण्यात आली आहे. सदरची सजावट विठ्ठल भक्त प्रदीपसिंह ठाकुर पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली असून, सजावटीचे काम श्री साई डेकोरेटर्स शिंदे ब्रदर्स पंढरपूर यांनी केले आहे. त्यासाठी सुमारे 20 कामगारांनी परिश्रम घेतले. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सेवा



करण्याबाबत आळंदी (जि.पुणे) येथील प्रदिपसिंह ठाकुर परिवाराने मंदिर समितीकडे सन 20 21 मध्ये इच्छा व्यक्त केली होती. तेव्हापासून म्हणजे मागील पाच वर्षापासून नववर्षी निमित्त मंदिरात सेवाभावी तत्त्वावर मोफत फुलांची आरास करून देत आहे.

नववर्षा निमित्त भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, भाविकांची गर्दी विचारात घेऊन भाविकांचे भराभर दर्शन होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे व इतर अनुषंगिक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महत्त्वाचे सण उत्सव, खास दिवस या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास, सजावट केली जाते. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर सजले असून, मंदिरात आकर्षक फळा-फुलांची आकर्षक सजावट करण्यात आल्याने, विठुरायाचे सावळे रूप अधिकच खुलून दिसत आहे. नवीन वर्षाची सुरुवात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाने व्हावी यासाठी हजारो भाविक श्री क्षेत्र पंढरपूरात दाखल झालेले आहेत. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शन रांगेत गर्दी केली असून, विठ्ठल रुक्मिणीमातेच्या नाम गजराने परिसर दुमदुमून गेला आहे. या सजावटीमुळे विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मुर्तीसह गाभारा पाहून देखील भाविक अधिक समाधानी होत आहे. नववर्षानिर्मित पंढरपूरात भाविकांनी गर्दी केली होती. मंदिर समितीच्यावतीने भाविकांना योग्य त्या सोयी-सुविधा देण्यात आल्या.



## » At a Glance

### १३२५ जणांचे रद्द होणार शस्त्र परवाने



**सोलापूर :** जिल्ह्यातील ग्रामीणमधील चार हजार ७८ जणांकडे तर शहरातील ५०२ व्यक्तींकडे वैयक्तिक शस्त्र परवाने आहेत. त्यांनी स्व: रक्षणासाठी पोलिसांकडून बंदूक वापरण्याचा परवाना घेतला. मात्र, आता नवीन परवाने देण्याचे बंद करण्यात आले असून पहिल्यांदाच सोलापूरचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी ग्रामीणमधील एक हजार ३२५ जणांचे शस्त्र परवाने रद्द करण्यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला आहे. दुसरीकडे पोलिस आयुक्तालयानेही शहरातील २० जणांचे परवाने रद्द केल्याची माहिती समोर आली आहे.

### घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने चोरी




**माढा :** अंबाड (ता. माढा) येथील राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याकडून १ लाख २० हजार रुपयांच्या सोने दागिन्यांची चोरी केली. याबाबत भीमराव संदीपान वनवे (रा. अंबाड, ता. माढा) यांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध ३० डिसेंबर रोजी दाखल केली आहे. कुलूप तोडून प्रवेश करीत घरातील असणाऱ्या एका पेटीतील ५ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या पिळाच्या चार अंगठ्या सुमारे ८० हजार रुपयांच्या आणि दहा ग्रॅम वजनाच्या सोन्याचे गंठण सुमारे ४० हजार असे एकूण १ लाख २० हजार रुपयांच्या किमतीचे चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### अक्कलकोटमध्ये भाविकांची गर्दी



**सोलापूर :** सोलापूरच्या अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या मंदिरातही भाविकांची गर्दी दिसून येत आहे. वर्षाच्या शेवटच्या दिवशी भाविकांनी या वटवृक्ष मंदिरात गर्दी केली आहे. स्वामी समर्थांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची पहाटेपासूनच गर्दी होत आहे. अक्कलकोट येथे स्वामींच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल झाले आहेत. नवीन वर्षाच्या स्वागताच्या तयारीसाठी अक्कलकोट मंदिर समितीकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे.

### विकास मंचचे गाजर दाखवून आंदोलन


**सोलापूर :** राज्य व केंद्र सरकारने सांगितल्याप्रमाणे सोलापूरची विमानसेवा सुरू न झाल्याबद्दल सोलापूर विकास मंचच्यावतीने जिल्हा परिषदेच्या पुनम गेटसमोर सोलापूर विकास मंचतर्फे गाजर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सोलापूरकर सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान उपोषणाद्वारे संतप्त सोलापूरकरांनी आपला आक्रोश व्यक्त केला. आंदोलनासाठी अधिकाधिक नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करण्यात आला. एआयच्या साहाय्याने व्हिडिओ आणि ऑडिओ संदेश पाठवून नागरिकांना आंदोलनाची माहिती देण्यात आली.

## नवी पेठ परिसरात मोकाट जनावरे; वाहतुकीची कोंडी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपुरात मोकाट जनावरांची संख्या वाढली आहे. ही जनावरे रस्त्यावर थांबत असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असून वाहनचालक त्रस्त झाले आहेत. मोकाट जनावरे सोडणाऱ्या मालकावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पंढरपुरात एक लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. यामुळे स्टेशन रोड, नवीपेठ, मंदिर परिसर, प्रदक्षिणामार्ग या ठिकाणी भाविकांची गर्दी दिसून येत आहे. मात्र याच ठिकाणी मोकाट जनावरे रस्त्यावर थांबली असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या अनेक महिन्यापासून पंढरपूर शहरात मोकाट जनावरांची संख्या वाढली



आहे. मात्र मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याकडे नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. मोकाट जनावरे रस्त्याच्या मधोमध थांबत असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी नगर परिषदेने मोकाट जनावरावर कारवाई करावी अन्यथा मालकांना दंड करावा अशी मागणी नागरिक व भाविकांत होत आहे . पंढरपुरात दररोज भाविकांची संख्या वाढत आहे. भाविकांना कोणताही त्रास होऊ नये अशा सूचना शासनाने प्रशासनाला दिलेल्या आहेत. मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष असल्यामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे.



### उक्कडगावात माकडाचा हैदोस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी तालुक्यातील उक्कडगावामध्ये एका माकडाने ग्रामस्थांची नाकातोंड चिडवली आहे. माकडाने गावातील घरांमध्ये घुसून अन्नधान्याची नासधूस केली आहे, तसेच महादेव मंदिराच्या कळसाचे नुकसान केले आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतीने वन विभागाकडे याबाबत चार महिन्यांपूर्वी तक्रार केली होती, मात्र वन विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांची स्थिती चिंताजनक झाली आहे.

## पवार कुटुंबातील वाद संपू दे
## आशाताई पवार यांचे विठ्ठलास साकडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** नवीन वर्षानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी पंढरपुरात येऊन श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विठ्ठलास पवार कुटुंबातील वाद संपू दे असे साकडे घातले. नवीन वर्षानिमित्त पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक दाखल झाले आहेत. नवीन वर्षाची सुरुवात अनेकांनी पंढरपुरात येऊन विठ्ठलाचे दर्शन घेऊन केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी आज सकाळी पंढरपुरात येऊन विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. यानंतर पत्रकारांची बोलताना त्या म्हणाल्या,



पवार कुटुंब एकत्र होते. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून दोन गट निर्माण झाले आहेत. पवार कुटुंब पुन्हा एकत्र यावे व पवार कुटुंबातील वाद मिटावा असे साकडे आपण विठ्ठलास घातले असल्याचे पत्रकारांशी बोलताना आशाताई यांनी सांगितले.

## अनिल पवार यांच्यावर हल्ला;
## चार जनावर गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** जुन्या भांडणाचा राग मनात धरून बांधकाम व्यावसायिक अनिल पवार यांच्यावर लक्ष्मी टाकळी परिसरात असलेल्या आनंद नगर येथे चार तरुणांनी हल्ला केला. यामध्ये पवार गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात चार जनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना 31 डिसेंबर रोजी रात्री घडल्यामुळे खळबळ उडाली आहे. अनिल पवार हे 31 डिसेंबर रोजी रात्री दुचाकीवरून बांधकाम मजुरांना त्यांच्या घरी सोडण्यासाठी गेले होते. मजुरांना घरी सोडून ते परत येत असताना आनंदनगर परिसरात उभे असलेले सुरज पवार, विकास पवार यश चव्हाण, अभिजीत चव्हाण यांनी



जुन्या भांडणाचा राग मनात धरून अनिल पवार यांच्यावर चाकूने व रॉडने हल्ला केला. यामध्ये अनिल पवार गंभीर जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी पवार यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेमुळे लक्ष्मी टाकळी परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात चार जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शहर भाजपची आढावा बैठक संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार जगदीश मुळीक यांनी शासकीय विश्रामगृह सोलापूर शहर येथे भारतीय जनता पक्षाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत पक्षाच्या आगामी धोरणांवर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्र सदस्यता नोंदणी संयोजक या नात्याने त्यांनी सोलापूर शहरात तसेच जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी आवश्यक असलेल्या मुद्द्यांवर उपस्थित पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपची तयारी आदी विविध मुद्द्यांवरही विशेष भर दिला.

वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

' दै.पंढरी संचार '

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०९९४२३४६
दत्तात्रय बनसोडे - ९८९०९६४७५

बुकिंग मर्यादा १५ जानेवारीपर्यंत.

## वारकरी भाविकांना सोयी-सुविधा देण्याचा प्रयत्न

# मंदिरास मिळाले एक वर्षात ५४ कोटी रुपयाचे दान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मातेला महाराष्ट्रासह इतर राज्यातून येणाऱ्या वारकरी भाविक भक्तांनी एका वर्षामध्ये समितीच्या विविध माध्यमातून सुमारे ५४ कोटी रुपयांचे दान केले आहे. याबाबत मंदिर समितीकडून मिळालेली अधिक माहिती अशी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस दिनांक १ जानेवारी ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत ५३ कोटी १७ लाखाचे दान प्राप्त झाल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने दर्शनरांग व्यवस्थापन, अन्नछत्र, लाडूप्रसाद, निवास इत्यादीचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांना श्रींच्या नित्यपुजा, पाद्यपुजा व तुळशीपूजा देखील उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या पायांना खडे टोचू नये म्हणून दर्शनरांगेत मॅटींग, विश्रांती कक्ष, आपत्कालिन दरवाजे, हिरकणी कक्ष, मोफत अन्नछत्र, एकादशीला शाबुदाणा खिचडी वाटप, द्वादशीला तांदळाची खिचडी, मिनरल वॉटर, चहा, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल इ. उपक्रम मंदिर समितीने सुरू केले आहेत. श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पुजेसाठी वाढती मागणी विचारात घेऊन, नित्यपुजेत २ भाविक कुटुंबियांना संधी, अन्नछत्र सहभाग योजना, महानैवेद्य सहभाग योजना, तुळशी अर्चन पुजा सुरू केल्या असून, त्याची नोंदणी देखील ऑनलाईन करण्यात आली आहे, या नोंदनीस भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मंदिर समितीस वारकरी भाविकांकडून चांगले दान मिळत असून, मिळालेल्या दानातून श्रींच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना चांगल्या व अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले. वारकरी भाविकभक्तांची पंढरीच्या श्री विठ्ठल रुक्मिणी वर अनन्य साधारण श्रद्धा असल्याने आषाढी मध्ये वारकरी, भावीक आळंदी ते पंढरपूर दिंडी मधून पायी चालत येतात. विठ्ठलाचे भक्त हे सर्वसामान्य मध्यम वर्गातील व गोरगरीब वर्गातील असल्याने विठ्ठलाकडे » पान ३ वर

**सोलापूर :** नववर्षाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३१ डिसेंबर रोजी विक्री करण्याच्या हेतूने साठा केलेला गोवा बनावटीचा ३ लाख ८५ हजार रुपयांचा मद्यसाठा राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला आहे. या पथकाने शहाजी गायकवाड (रा. गायकवाड वस्ती, टाकळी सिकंदर, ता. मोहोळ) याने शौचालयात लपविलेल्या भारतीय बनावटीच्या गोवानिर्मित विदेशी दारुच्या ३०० बाटल्या व आकाश धनंजय गवळी याच्या घरातून ६०० बाटल्या जप्त करुन दोघांना अटक केली आहे.

### पंढरीतील जुना कराड नाका परिसरातील जन्मभूमीत झाला जंगी सत्कार

# पंढरपूरच्या निवडणुकातूनही मालकशाही संपुष्ठात आणू : आ. राजाभाऊ खरे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मोहोळ विधानसभा निवडणूक लढवीत असताना. माझा पराभव व्हावा या उद्देशाने, तीन मोठे मालक प्रयत्नशील होते. यामधून मोहोळच्या मालकाचा पराभव केला आहे. पंढरपूरच्या आगामी निवडणुकांमध्ये इथल्याही मालकशाहीला न घाबरता, परिवर्तन आघाडीची मोट बांधून महाविकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढवण्यासाठी आतापासून तयारी सुरू करणार असल्याचे आमदार राजाभाऊ खरे यांनी ठणकावून सांगितले आहे.

पंढरपूर येथील जुना करार नाका परिसरामध्ये आमदार राजाभाऊ खरे यांचे बालपण गेले आहे. यामुळे या भागात खरे यांची जन्मभूमी आहे. आपला माणूस आमदार झाला. या उद्देशाने पंचशील मंडळ, पंचशील तरुण मंडळ, आम्रपाली महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी सायंकाळी भव्य शाही सत्कार कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी आ. राजाभाऊ खरे यांनी वरील आव्हान दिले आहे.

ज्या ठिकाणी हा सत्कार सोहळा पार पडला. याच ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 87वर्षांपूर्वी भेट दिली होती. या भेटीला 30 डिसेंबर रोजी वर्धापन दिन आयोजित करण्यात आला असून, याच कार्यक्रमचे वेळी आ. राजाभाऊ खरे यांचा सन्मान करण्यात आला. या कर्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आर पी आय चे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे तर अध्यक्षस्थानी पंचशील मंडळाचे अध्यक्ष आर पी कांबळे उपस्थित होते.

या सत्कारास उत्तर देताना आ. राजाभाऊ खरे यांनी आपल्या परखड भाषणात निवडणुकीत विरोध करणाऱ्या नेत्यांचा खरपूस समाचार घेत, यापुढील काळात त्यांनाही आपण विविध निवडणुकीत जशास तसें उत्तर देणार असल्याचे सांगत, बौद्ध समाजातील लोकांनी आपल्या मताचे मोल ठरवून घ्यावे लागेल. आपणही यापुढील काळात राजकीय बदला घेण्यासाठी सर्वांनी एकजूटीने राहावे लागेल. ही एकजूट दाखविल्यास आपल्या विचाराचे लोक निवडून आणण्यासाठी मी स्वतः वाटेल ती किंमत मोजायला तयार असल्याचे आ. खरे यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आ खरे म्हणाले की



आपण आमदार होण्याचा निर्धार 1991 केला होता. त्यासाठी तब्बल 34वर्ष लागले. आपल्या प्रचंड इच्छा शक्तीचे जोरावर हे विधानसभा सभेत जाण्याचे स्वप्न सत्यात उतरले आहे. हे करीत असताना आपण ध्येय सोडले नव्हते. सर्वपक्षीय लोकांशी चांगले संबंध ठेवून हा विजय मिळावीने सोपे गेलं असून, प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांचीही फार मोलाची साथ मिळाल्याचा गोपी स्फोटही आमदार राजू खरे यांनी व्यक्त केला आहे.

आपणास तुतारीची उमेदवारी मिळविताना फार अडचणीचा सामना करावा लागला होता.सोलापूर जिल्ह्यात सारंजामशाहीने मालकशाही हा मोठा प्रकार आहे. ते लोक राजकीय पक्ष न पाहता, आपल्या सर्वसामान्य समाजाला सहजासहजी राजकारणात मोठी संधी मिळू देत नाहीत. त्याच पद्धतीचे राजकारण माझ्या बाबतीत दिसून आले.'अनगरकर व्हाया अकलूज मार्गे बारामती' असा प्रवास करीत माझी तुतारीची उमेदवारी कट झाली.मात्र माझ्या रक्तातच बंडखोरी असल्याने घटनेने दिलेले मिळत नसेल तर हिसकावून घेत आपण एकटे बळीरामकाका साठे आणि सर्व विरोधक यांनी मिळून मला उमेदवारी मिळवून देण्यातही अन आमदार कारण्यातही यश मिळविले आहे.

मला आमदार होवू नये यासाठी मोहोळचे राजन पाटील, पंढरपूरचे परिचारक आणि काळे, अन उत्तर सोलापूरचे दिलीप माने या तीनही मालकांनी मोठी तयारी बांधली होती.त्यावर मात करीत ही लढाई पार पडली. अनगरकर यांच्या 50वर्षातील राजकारणाला मोठा सुरुंग लावला तसाच सुरुंग आपण राहीलेल्या दोन मालकांना आगामी निवडणुकात नक्की लावू. यासाठी आपल्या बौद्ध समाजाने सावध भूमिका बजावली पाहिजे असे आवाहन आ. खरे यांनी यावेळी केले आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनीही आपल्या भाषणात आ. राजाभाऊ खरे याचे विशेष कौतुक केले. 1946 नंतर आपल्या सोलापूर जिल्ह्यात आपल्या विचाराचे पहिले आमदार निवडून आल्याचे सांगितले. आपल्या मागासवर्गीय समाजाचा मोठा निधी असतो. आपल्याच मागासवर्गीय समाजासाठी वापरण्यात यावा. हा निधी दुसरीकडे वळवण्यासाठी आपण विरोध करावा. असा सल्ला देण्यात आला.आपला माणूस चांगलेच काम करून दाखवेल. यासाठी यापुढील काळातही आ. खरे यांच्या पाठीशी सर्वांनी उभे राहावेच लागेल असे आवाहन राजाभाऊ सरवदे यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आर पी कांबळे यांनीही आपले विचार मांडले. तसेच जितेंद्र बनसोडे, कुमार ढवळे, सुधीर मागाडे यांनीही आ. राजाभाऊ खरे यांचे जुन्या लहानपणी पासूनच्या आठवणी सांगितल्या. यावेळी आ. खरे यांच्या पत्नी सौं तृप्तीताई खरे, आई कांताबाई खरे, वडील ज्ञानू खरे यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डी बी पाटोळे सर यांनी केले. आभार प्रदर्शन अॅड. महेश कसबे यांनी मानले.

## Selected

### संतोष देशमुख हत्येप्रकरणी करमाळ्यात धरणे आंदोलन



**करमाळा :** सरपंच संतोष देशमुख हत्येचा निषेध करण्यासाठी करमाळ्यात धरणे आंदोलन झाले. याबरोबर परभणी येथील आंबेडकरी आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत संशयास्पद मृत्यू यांचाही यावेळी निषेध करण्यात आला. करमाळा तहसील कार्यालयासमोर प्रा. रामदास झोळ व शेतकरी कामगार संघटनेचे दशरथ कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन करण्यात आले. पीडितांच्या कुटुंबीयांना लवकरात लवकर न्याय द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### शिक्षक, कर्मचारी यांना त्वरित पगार द्या



**सोलापूर :** राज्यातील शिक्षक, कर्मचारी यांना त्वरित पगार द्या व दिव्यांग शाळा शिक्षक व कर्मचाऱ्यांची पाच महिन्यापासूनची उपासमार थांबवा या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्यावतीने राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच राज्य शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, राज्याचे शिक्षण आयुक्त यांना पाठवण्यात आले आहे. सोलापूरचे जिल्हा अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना समक्ष भेटून हे निवेदन देण्यात आले.

### वाहनाच्या धडकेत अज्ञात इसमाचा मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** बीएमआयटी महाविद्यालयाजवळ असलेल्या पेट्रोल पंपाजवळ साई हॉटेल समोर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका अज्ञात 50 वर्षीय इसमाचा मृत्यू झाला. ही घटना 26 डिसेंबर रोजी रात्री घडली. याबाबत पोलीस हेड कॉन्स्टेबल दीपक उपासे यांच्या फिर्यादीवरून सलगर वस्ती पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खामकर हे करीत आहेत.

### माळशिरस नगरपंचायत न्यूतन नगराध्यक्ष पदासाठी वस्ताद विजय देशमुख यांचा एकमेव अर्ज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** माळशिरस नगरपंचायतीचे या अगोदरचे नगराध्यक्ष ताई वावरे यांनी राजीनामा दिल्यानंतर आज मंगळवार दि. ३१/१२/२०२४ रोजी माळशिरस नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी डॉक्टर कल्याण हुलगे यांच्याकडे नामनिर्देशन पत्र मान्यवरांच्या उपस्थितीत सादर करण्यात आले आहे. उमेदवारी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची तारीख व वेळ संपल्यानंतर एकमेव अर्ज आलेला आहे. मुख्याधिकारी नगरपरिषद पंढरपूर तथा पिठासन अधिकारी डॉक्टर



प्रशांत जाधव दि. ०८/०१/२०२५ रोजी निवडणूक विशेष सभेमध्ये बिनविरोध नगराध्यक्ष वस्ताद विजयराव देशमुख यांच्या नावाची अधिकृत घोषणा करतील.

### कार्यशाळा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** जिल्हा परीषद शाळा पाटीलवस्ती 60 फाटा शाळेत निरोप देवून गत वर्षाला रंगोत्सव साजरा करू नववर्षाचा उपक्रम अंतर्गत भेटकार्ड निर्मिती कार्यशाळाचे आयोजन दिनांक 31/12/2024 रोजी करणेत आले.

### दारू नाही दूध प्या उपक्रमाने केले नववर्षाचे स्वागत



**सोलापूर :** पश्चिमात्य देशाचे अनुकरण करून सरत्या वर्षाला निरोप देताना रात्री पार्ट्या करून तरुणाई दारू पिऊन झिंगाट वाहने चालवताना आढळते. यापासून रोखण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने मध्यरात्री बारा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात दारू नाही दूध प्या या उपक्रमांतर्गत दुधाचे वाटप करण्यात आले. यावेळी युवकांनो दारू नाही दूध प्या, दारूने झिंगला संसार भंगला अशा विविध प्रकारचे फलक संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी हाती धरले होते. तसेच बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांना गुलाब पुष्प देऊन नववर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

### 31 डिसेंबरच्या पार्टीला दिली रानभोजनाला पसंती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्र भरामध्ये 31 डिसेंबरच्या निमित्ताने ठीक ठिकाणी मांसाहारी शाकाहरी पार्टीचं आयोजन केलं जातं परंतु सोलापूरकरांनी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी 31 डिसेंबरची पार्टी ही रान शिवारात करण्याला पसंती दिली. शहरी वातावरणापासून लांब जाऊन निसर्गाच्या सानिध्यात रान शिवारात सोलापूरकर 31 डिसेंबरची पार्टी साजरी करत आहेत यामध्ये सोलापूरकर रानभोजनाचा आस्वाद घेताना देखील दिसत आहेत. पाश्चात संस्कृतीमुळे समाजामध्ये तेढ निर्माण होते. त्यामुळे ३१ डिसेंबर रोजी पार्टी करुन मद्यधुंद होऊन धांगडधिंगाणा घालून समाजामध्ये वाद निर्माण होण्यास खतपाणी घातले असून यावर पायबंद घालून यावर उपाय म्हणून ३१ डिसेंबर साजरी न करता शिवरात जाऊन निसर्गाच्या सानिध्यात भोजनाचा आस्वाद घेतना नागरिक दिसत होते.

### फ्लेमिंगोंची वाढणार संख्या-कुंभार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** उजनीचे मुख्य व खास आकर्षण असलेले फ्लेमिंगो (रोहित) पक्षी गेल्या महिन्यात पाच- पन्नास संख्येने उजनी जलाशय परिसरात दाखल झाले आहेत. धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे यापुढे मुबलक खाद्य उपलब्ध होणार. यामुळे जलाशयाचे काठ उघडे पडून स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांना मुबलक खाद्यान्न उपलब्ध होईल व येत्या काही दिवसांत विविध पक्ष्यांची गर्दी वाढेल, असा अंदाज उजनी परिक्रमा करणारे पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी वर्तवला.

### जिल्हा परिषद शाळा पाटील वस्ती साठ फाटा येथे भेटकार्ड निर्मिती कार्यशाळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** जिल्हा परीषद शाळा पाटीलवस्ती 60 फाटा शाळेत निरोप देवून गत वर्षाला रंगोत्सव साजरा करू नववर्षाचा उपक्रम अंतर्गत भेटकार्ड निर्मिती कार्यशाळाचे आयोजन दिनांक 31/12/2024 रोजी करणेत आले. मराठी, इंग्रजी भाषेत सण समारंभा वेळी देण्यात येणारे शुभेच्छा संदेश,हसत खेळत शिकताना अंकांच्या आकडेमोडीसोबत भूमितीय आकारांची सुंदर नक्षी कोरताना कागदांशी खेळत कार्य कृतींशी कलेची जोड जमली, आप्तस्वकियांना शुभेच्छा देण्यासाठी विद्यार्थ्यांमार्फत स्वनिर्मित रंगांची उधळण करत संदेशवहनाची अनोखी भेटकार्डे तयार झाली. शालेय सर्व विषयांची सांगड घालून विद्यार्थ्यांना भेटकार्ड तयार करण्यास मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ मार्गदर्शिका, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा, पत्रकार व पालक अशा अनेक भूमिका उत्कृष्ट पद्धतीने निभावणाऱ्या,सदैव शाळेच्या, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या सौ. शोभा तानाजी वाघमोडे यांचे श्री. निकम सर व सौ.गायकवाड मॅडम यांनी आभार मानले. यावेळी जि. प. प्रा. शाळा पाटीलवस्ती (मा) येथील सर्व ग्रामस्थ, महिला भगिनी, माता पालक,माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य,माता पालक संघ,निपुण भारत माता पालक समिती, सखी सावित्री समिती,शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य अंगणवाडी सेविका, मदतनीस, पाटीलवस्ती शाळेतील शिक्षक व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

#### ढोराळ्यात शॉर्टसर्किटने आग; साडेचार लाखांचे नुकसान

**बार्शी -** बार्शी तालुक्यात ढोराळे येथील शहाजी बलभीम आवारे यांच्या राहत्या घरी शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत जीवनावश्यक वस्तूसह इलेक्ट्रॉनिक व शेती माल जळून खाक झाला. या घटनेत साडेचार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. शहाजी बलभीम आवारे हे वेळ अमावास्या असल्याने कुटुंबीयांसह शेतात गेले होते. घरी आई एकटीच होती. दुपारी घरात आग लागल्यानंतर त्यांनी आरडाओरडा केला. या आगीत घरातील टीव्ही, फ्रिज, कूलर, दुसरा एलईडी टीव्ही यासह इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तू जळून खाक झाल्या.

### देशी गाय पालन पोषणासाठी अनुदान योजनेला मुदतवाढ



**सोलापूर :** गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालन पोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय पन्नास रुपये अनुदान देण्यात येणार आहे. योजनेसाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत व सदर शासन निर्णयामधील नमुद निकषानुसार पात्र गोशाळा, गोसदन पांजरापोळ व गोरक्षण संस्थांनी दि. 5 जानेवारी 2025 रोजीपर्यंत ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. विशाल येवले यांनी केले आहे. या योजनेबाबतची सर्व माहिती www.mahagosevaayog.org व schemes.mahagosevaayog.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### माजी आ. राम सातपुते यांचा सवाल

# जिल्ह्यात मोहीते पाटील यांच्या कारखान्याचा दर का कमी ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सोलापूर जिल्ह्यात अनेक ऊस कारखाने सुरू असून आपल्या ऊस उत्पादक सभासदांना योग्य दर देत आहेत मात्र अकलूजच्या स म शं मो पाटील साखर कारखाना आपल्या सभासदांना कमी दर देत आहे यामुळे या करखाण्याचे सभासद जादा दर देणाऱ्या कारखान्याकडे आपला ऊस गाळपास देत आहेत अशा सभासदांना अकलूजच्या कारखाना प्रशासनाने नोटीस काढून कारवाई करण्याची नोटीस दिल्याने सभासद नाराज आहेत मग सभासदांना नोटीस देण्याऐवजी कारखान्याने योग्य दर दयावा जिल्ह्यात मोहीते पाटील यांच्या कारखान्याचा दर का कमी असा सवाल मा आ राम सातपुते यांनी उपस्थित केला आहे.

मा आ राम सातपुते यांनी अकलूजच्या कारखान्या बाबतीत काही सवाल उपस्थित केले आहेत यामध्ये शेतकऱ्यांनी अकलूज च्या करखण्यास ऊस का द्यावा ?



कारण जिल्ह्यात सर्वात कमी दर तुमच्या कारखान्याला. कारखाना सुरू होण्यापूर्वी किंवा सुरू झाल्या झाल्या उसाचे दर घोषित करीत नाही. कारखान्याने गेल्यावर्षी शेतकऱ्यांना फक्त 2600 रुपये दर दिला तर इतर कारखान्याचा 2800 - 3000 इतका दर होता. कारखान्याच्या कामगाराचे पगार वेळेवर करीत नाही. उलट चेयरमन स्वतःच्या जन्मदिनानिमित्त कामगारांचे पगार कपात करून त्यातून स्वतःसाठी भेटवस्तू घेतात सत्ताधारी यांनी पतसंस्था बुडवून खाल्ली उद्या कारखाना विकून खाल्ला आणि बिलच भेटल नाही तर शेतकऱ्यांनी कुणाच्या दारात जायचं ?

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे निम्मे कर्मचारी चेअरमन यांच्या स्वमालकीच्या वॉटर पार्क वर सभासदांच्या पैशातून काम करतात आणि या वॉटर पार्क चा सर्व मलिदा चेअरमन यांना मिळतो मग शेतकऱ्यांनी या कारखान्यास ऊस देऊन स्वतःचा तोटा करून का घ्यावा ? असे अनेक प्रश्न माळशिरस चे माजी आ राम सातपुते यांनी उपस्थित केले आहेत.

पंढरी संचार

**सोलापूर :** नवीन वर्षाच्या सुरुवातीच्या दिवसापासूनच परीक्षा हंगाम सुरु झाला आहे. सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या प्रॅक्टिकल परीक्षांना आजपासून (1 जानेवारी) सुरुवात झाली आहे. या परीक्षा 14 जानेवारीपर्यंत चालणार आहेत. त्यानंतर इयत्ता दहावीची लेखी परीक्षा 15 फेब्रुवारी ते 18 मार्च या कालावधीत तर इयत्ता बारावीची लेखी परीक्षा 15 फेब्रुवारी ते 4 एप्रिल या कालावधीत होणार आहे.

## स्वेरीमध्ये 'अवकाश महायात्रे' चा समारोप

# 'विज्ञान भारती' आणि 'इस्त्रो यांच्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर -डॉ.मिनाक्षी पवार

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** 'स्वेरीमध्ये 'विज्ञानभारती' आणि 'इस्त्रो 'यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'स्पेस ऑन व्हिल्स' या उपक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या अवकाशातील अदभूत माहितीमुळे विद्यार्थी प्रचंड उत्साही झाले. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमातून अवकाशातील ग्रह, तारे यांविषयी पुस्तकी ज्ञान मिळत आहेच परंतु या 'स्पेस ऑन व्हील्स (अंतरीक्ष महायात्रा बस)' मधील प्रदर्शनामुळे विद्यार्थी आणि अवकाश अजून जवळ आल्यासारखे वाटत होते. या अंतरीक्ष महायात्रेच्या अनुषंगाने आयोजिलेल्या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडली.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी केले.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर मध्ये 'विज्ञानभारती' आणि 'इस्त्रो' यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवस आयोजिलेल्या अंतरीक्ष महायात्रेच्या समारोप प्रसंगी स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार ह्या मार्गदर्शन करत होत्या. अंतराळातील महत्वाची माहिती देण्यासाठी भारतीय अंतराळ संस्थेने (इस्त्रो) मोहीम हाती घेतली असून केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्त्रोने अंतराळाच्या ज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी एक विशेष 'अंतराळ यात्रा बस' तयार केली असून बसच्या माध्यमातून चंद्र, सूर्य, ग्रह, तारे जवळून पाहण्याची अनुभूती घेत अंतराळाची वैज्ञानिक माहिती विद्यार्थ्यांना घेता आली. 'अंतराळ यात्रा बस'मध्ये भारतीय 'इस्त्रो' तथा 'अंतराळ संशोधन संस्था (इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन-इस्त्रो)' च्या माध्यमातून अंतराळ व त्याअंतर्गत असलेल्या आर्यभट्ट उपग्रह, भास्कर उपग्रह, उपग्रहांच्या अनुषंगाने वातावरणात त्यांच्या फिरण्याच्या किंवा स्थिर राहण्याच्या कक्षा (ऑर्बिट), मंगळ ग्रह, चंद्र, चांद्रयान, ग्रहमालिका, चंद्रावर पाऊल ठेवणारा पहिला मानव, त्यावेळची स्थिती, चांद्रयान व मंगळयान मोहिमांबरोबरच सूर्यकेंद्री कक्षेत अवकाशयान पाठवून सूर्य किरणांमधील अतिनील वर्ण, सौर कण, सौर किरीट, सौर वात, चुंबकीय, सौर किरीट वर्णपट विश्लेषक, अतिनील किरणांची दुर्बीण, चुंबकीय प्रभाव मापक तसेच क्ष-किरण व प्लाझ्मा कण यांचे विश्लेषण, त्यानंतर यशस्वी उड्डाण केलेल्या चंद्रयान-३ ची साहित्य व साधने, उपग्रहांची प्रतिकृती, तसेच चंद्रावरील मृदा, याची ध्वनी क्लिप, चित्रफित, सूक्ष्म उपगृह या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना दिसून आले. अवकाशातील हे सर्व उपगृह, त्यांची सविस्तर माहिती, फलक, भित्तीपत्रके, या बाबी पाहून विद्यार्थी प्रचंड उत्साही झाले होते. सलग दोन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाचा लाभ श्री. दर्लिंग विद्यामंदीर चळे, सिताराम महाराज विद्यामंदीर खर्डी, शरदचंद्र कृषी विद्यालय मारापूर, दौलतराव विद्यालय कासेगाव, जिजामाता प्रशाला आंबे, आचार्य दोंदे विद्यालय ओझेवाडी, लोटस इंग्लिश स्कूल कासेगाव, मातोश्री ईश्वरम्मा विद्यालय पंढरपूर, आपटे उपलप प्रशाला पंढरपूर, मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला पंढरपूर, आदर्श प्रशाला व ज्युनिअर कॉलेज करकंब, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय मुंढेवाडी, मातोश्री रुक्मिणी गंगाराम होळकर विदयालय व्हळे, यशकिर्ती विद्यालय पंढरपूर, माध्यमिक विद्यालय नेपतगाव, जवाहरलाल नेहरू हायस्कूल सिद्धेवाडी, शांताप्रभू प्रशाला अजनसोंड, कवठेकर प्रशाला पंढरपूर या विद्यालयांतील जवळपास २५०० विद्यार्थी व शिक्षकांनी घेतला. यावेळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) तर्फे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. ए.एस.भातलवंडे यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापकांच्या सहकार्याने अवकाश प्रदर्शन संबंधित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध या स्पर्धांचे आयोजन केले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली तसेच या दोन दिवसीय प्रदर्शनासाठी 'विज्ञानभारती', पश्चिम महाराष्ट्रचे सचिव कौस्तुभ साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली एमबीए विभागातील विद्यार्थ्यांना एक दिवसीय विशेष प्रशिक्षण दिले होते. त्यामुळे प्रदर्शन पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना एमबीए विभागप्रमुख डॉ.के.पी.गलानी यांच्या नेतृत्वाखाली ५५ विद्यार्थ्यांनी अंतराळ संबंधी अचूक माहिती दिली. 'अंतराळ यात्रा प्रदर्शन' यशस्वी होण्यासाठी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी. केने, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम. एस. मठपती, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ.के.बी.पाटील, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## हार्वेस्टर मशीन अंगावरून गेल्याने शेतकऱ्याचा मृत्यू



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट तालुक्यातील कोळेकरवाडी येथे तुरीची रास करताना एका शेतकऱ्याचा अंगावरून हार्वेस्टर मशीन गेल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. मल्हारी बाजीराव घावटे (वय ५०) असे या मृत शेतकऱ्याचे नाव आहे. अक्कलकोट येथील रमेश डिग्गे यांची शेती मृत शेतकरी घावटे हे बटाईने करत होते. सोमवारी तुरीची रास सुरू असताना घावटे यांच्या पाय व छातीवरून हार्वेस्टर मशीन गेल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. याबाबत पोलिसात नोंद करण्यात आली आहे.

» पान १ वरुन

## मंदिरास मिळाले एक वर्षात ५४ कोटी...

केलेली मागणी पूर्ण होते ही आस घेऊन ऊन,वारा, पावसाची तमा न बाळगता मजल दरमजल करत पायी चालत विठ्ठल भेटीसाठी पंढरीत येत असतात. यामध्ये कष्टकरी कामगार वर्ग मोठ्या प्रमाणे असल्याने एक वेळ पोटाला न खाता हे वारकरी भक्त विठ्ठलासाठी दान करत असल्याने सन २०२४ मध्ये विठ्ठलाच्या चरणी विविध माध्यमातून याच भक्तांनी सुमारे ५४ कोटीचे दान दिले आहे.

» Selected

## भाजपची सोलापूर ग्रामीण पूर्व सदस्यता अभियान कार्यशाळा

**सोलापूर :** भारतीय जनता पक्षाची सोलापूर ग्रामीण (पूर्व) तर्फे सदस्यता अभियान कार्यशाळा शिवस्मारक येथे संपन्न झाली. यावेळी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुभाष देशमुख यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले सर्व कार्यकर्त्यांनी सदस्यता अभियानात सक्रिय सहभाग घेऊन संघटना मजबूत करण्यासाठी बूथनिहाय नियोजन करावे. तसेच आगामी काळात संघटनात्मक निवडणुकांसाठी सर्वांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून पक्ष संघटना अधिक सक्षम करावी. या कार्यशाळेस प्रदेश सहसंयोजक जगदीश मुळीक, कार्यशाळेचे प्रभारी भरत पाटील आदी उपस्थित होते.

## कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या १५ जनावरांची सुटका



**सांगोला :** पोलिस अधीक्षक यांच्याकडील ऑल आऊट ऑपरेशन पथक व सांगोला पोलिस स्टेशन यांनी संयुक्तपणे अचानक धाड टाकून अवैधरित्या कत्तलखान्याकडे कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाताना आयशर टेम्पोमधून सुमारे १५ जनावरे ताब्यात घेऊन टेम्पो जप्त केला तर जनावरांची गोशाळेकडे रवानगी केली. ही कारवाई रविवारी मध्यरात्री एकच्या सुमारास भीम नगर, सांगोला येथे केली. याबाबत पोलिस कॉन्स्टेबल निशांत सावंजी यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी विजय काशिनाथ ऐवळे व विजय भोजा जावीर (रा. लोणार, ता. मंगळवेढा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## आमदार अभिजीत पाटील यांनी घेतली ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेची भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माढा :** माढा विधानसेभेचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे याची मुंबई येथे भेट घेऊन विविध मागण्यांचे पत्र दिले. माढा येथे जिल्हा परिषद जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी आवश्यक निधी मिळावा याकरिता ग्रामविकास मंत्री ना.श्री.जयकुमार गोरे साहेब यांना निवेदन दिले. माढा शहरामधील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये ३मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार झाल्यावर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व अनेकांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच जागेतील आतील बाजुस क्लासरूम व शाळेसाठी वॉल कंपाऊंड तयार करणे ही गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक निधी मंजुर करण्यात यावा,अशी मागणी केल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## निवेदन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** छत्रपती शिवाजी महाराजाचे वंशज ना.श्री.शिवेंद्रराजे भोसले यांनी मंत्री पदाचा पदभार घेताच पहिलेच पत्र माढा मतदार संघाचे आ. अभिजीत पाटील यांनी संत मुक्ताबाई पालखी महामार्ग व्हावा म्हणून जावक क्रमांक १ ने सुरू झाला असून याचा आनंद झाला.याप्रसंगी शिवेंद्रराजे भोसले यांचा सत्कार करताना आ. अभिजीत पाटील.

## पुस्तकातील विचारधनामुळे समाज श्रीमंत होतो



**सोलापूर :** चांगल्या पुस्तकांमध्ये समाजाला दिशा देण्याची ताकद असते. पुस्तकांमधील विचारधनामुळे समाज श्रीमंत होतो, असे मत माजी मंत्री दिलीप सोपल यांनी व्यक्त केले. येथील ज्येष्ठ व्यापारी सुरेशचंद्र कुंकुलोळ यांच्या "माझ्या नोंदी व अर्थपूर्ण शोध" या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे, व्यंकटेश जोशी, बाळासाहेब पानसरे, वैभव वानखडे, सुरेश कुंकुलोळ उपस्थित होते.

## काठीने मारहाण करून जमिनीवर गोळीबार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** हॉटेल व्यवसायाच्या भांडणातून एकाने काठीने मारहाण करुन अन्य एकास जखमी केले. झटापटीत गावठी पिस्तुलमधून जमीनीवर गोळीबार करुन दहशत निर्माण केली. ही घटना कारणावरून माढा तालुक्यातील मौजे रुई गावच्या हद्दीतील म्हसोबा देवस्थान येथे भीमा नदीकाठी घडली. आरमान अल्लाउद्दीन शेख असे गोळीबार करुन पलायन केलेल्याचे नाव आहे. बशीर मौलाना मुलाणी (वय 30, रा. रुई) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याबाबत बशीर मुलाणी यांचे मेहुणे जावेद बाळू काझी यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दिली आहे.

## देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाचा घाला



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** स्कॉर्पिओ आणि आयचचर ट्रकचा झाला भीषण अपघात झाला आहे. अक्कलकोट श्री स्वामी समर्थ दर्शन घेऊन गणगापूरला जातं असताना मैंदर्गी जवळ अपघात झाला. समोरासमोर झालेल्या अपघातात 2 महिला आणि 2 पुरुष जागीच ठार, तर 7 ते 8 जण गंभीर जखमी झाले असून सर्व भाविक नांदेड जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती, अपघातस्थळी अक्कलकोट पोलीस दाखल झाले असून जखमीना तातडीने अक्कलकोट सार्वजनिक रुग्णालयात करण्यात दाखल आहे.

## मोहोळ तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी महेश सोवनी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** मोहोळ तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी महेश सोवनी, सचिवपदी दै.जनमत चे अशोक पाचकुडवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी दै.पुण्यनगरीचे सुहास घोडके आणि दै.नवराष्ट्रचे दादासाहेब गायकवाड आणि खजिनदार म्हणून दै.दिव्य मराठी चे संमेद शहा यांची निवड करण्यात आली.

मोहोळ तालुका पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीच्या निवडीची बैठक रविवारी येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. या बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मावळते तालुकाध्यक्ष विष्णु शिंदे हे होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या बैठकीत उपस्थित सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली. त्यानंतर वरील प्रमाणे निवडी करण्यात आल्या. या बैठकीला राजकुमार शहा, दिलीप देशपांडे, संजय आठवले, अशोक कांबळे, महेश कुलकर्णी, बालाजी शेळके,प्रा.चंद्रकांत देवकते, किशोर मारकड,राजू शिंदे, राम कांबळे, गो.रा. कुंभार, सुभाष शिंदे आदि पत्रकार उपस्थित होते. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला यानंतर आगामी काळात करण्यात येणार असलेल्या कार्यक्रमाविषयी चर्चाही करण्यात आली. आभार प्रदर्शना नंतर बैठक समाप्त झाली

## भाजपच्या सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा सदस्य नोंदणी अभियान प्रशिक्षण आमदार देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी आमदार देशमुख यांनी भाजपा सदस्य नोंदणी अभियान बद्दल माहिती देत सर्व भाजपा पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नरेंद्र काळे, प्रा. नारायण बनसोडे, डॉ. किरण देशमुख, रोहिणी तडवळकर आदी उपस्थित होते.




जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मो.प्र.-१ दिनांक-१८/१०/२०२३
परिशिष्ट-४

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्रमांक-२ सोलापूर यांचे कार्यालय**
**मोहितेनगर, आयकर भवन शेजारी, होटगी रोड, सोलापूर- ४१३००३**

**निविदा सुचना क्रमांक १२ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २ सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये कांही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकांवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**कामाचे नांव** : भीमा पाटबंधारे उपविभाग तुंगत अंतर्गत भीमा पाटबंधारे शाखा क्र. १५ तारापूर येथे खरीप रब्बी व उन्हाळा या कालावधी करीता सिंचन व्यवस्थापन व कार्यालयीन कामाच्या मुदतीसाठी अर्ध कुशल मजूरांची नियुक्ती करणे व JCB या प्रकाराचे यंत्र बाह्य यंत्रणेव्दारे पुरवठा करण्याचे काम सन २०२४-२५.

**जिल्हा** : सोलापूर

**निविदेची किंमत रुपये** : ८,१७,३१२/-

**१. निविदा उपलब्ध कालावधी** : दि. ०२.०१.२०२५ ते दि. ०९.०१.२०२५

**२. निविदा सादर कालावधी** : दि. १०.०१.२०२५ ते दि. १३.०१.२०२५

**३. निविदा उघडण्याचा दिनांक** : .दि. १४.०१.२०२५ रोजी

जा.क्र.भीविवि-२/लेशा-४/४५४२/२०२४
भीमा विकास विभाग क्र. २,
सोलापूर दि. २४ डिसें.२०२४

**सही/-**
**( सं.ज.माने)**
**कार्यकारी अभियंता**
**भीमा विकास विभाग क्र.२,**
**सोलापूर**


**जिमाका/सो/जाहि/२४७/२०२४-२५**

संपादकीय विशेष

# सरते वर्ष आणि पुढील अपेक्षा !

संकल्प आणि सिद्धी हे जीवनाचा अविभाज्य अंग असते. संकल्पावर विश्वास असायला हवा असतो तेंव्हा कृतीचा साक्षात्कार जीवनात उतरत असतो. हे मानव धर्माचे वैशिष्ट्य आहे. आज २ जानेवारी २०२५ चा पहिला अंक वाचकांच्या हातात देताना सर्व वाचकांना शुभेच्छेचे कमलपुष्प अर्पण करत असताना एक आगळे-वेगळे समाधान वृत्तपत्रीय प्रवासात अनुभवायला आल्याशिवाय राहात नाही. २०२४ हे पूर्ण वर्ष शेवट शेवट निवडणूकीच्या धावपळीत गेले आणि पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचा प्रत्यक्ष कृतीचा भाग आपण अनुभवला. राजसत्तेचा सारीपाट नशीबावरती अवलंबून नसतो, आर्थिक व्यवहारावर अवलंबून नसतो तर तो सामाजिक कर्तृत्वाचा आणि राष्ट्रनिष्ठेच्या प्रेमाचा एक अविभाज्य भाग असतो. दिल्लीतल्या सत्तेवर कोण बसलं किंवा महाराष्ट्रातील सत्तेवर कोण बसलं यावर चर्चा करण्यापेक्षा संविधानानी दिलेलेला आदेश देशानी आणि महाराष्ट्रानी तंतोतंत पाळून लोकशाहीची बळकटी अधिक दृढ करण्यास मदत केली. याबाबत ईव्हीएम किंवा मतपत्रिका यांच्यावरचा संशयकल्लोळ काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि न्यायदेवतेपासून ते ग्रामसभेपर्यंत सर्वत्र कल्लोळ माजवून गेला. शेवटी न्यायदानाने न्याय दिला. आणि खऱ्या अर्थाने हा विषय, हा हल्लकल्लोळ शांत झाला. कुणी न्यायालयाला आव्हान दिले, कुणी निवडणूक यंत्रणेला दोषी ठरविले तर कोणी अन्य मार्गांनी या निवडणूक पद्धतीला दोषी ठरविले. न्यायासमोर सगळे समान असतात. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाने लोकशाही मानणारांची मान झुकली पाहिजे हे सत्य वास्तवात आले. मागील वर्ष थोडेसे धकाधकीचे, गरमागरमीचे गेले. निसर्गानी कुठे अवेळी कोप केला, निसर्गाच्या काळाने धान खाऊन टाकले. फळ बेचव केली आणि धरणीमाता त्राहीत्राही होत असतानाच जमिनीचा मालक संकटाच्या दरीत कोसळून पडला. हे सरत्या वर्षाचं वास्तव आहे. राजकारणातल्या अनेक गमती-जमती या मागील वर्षाने जशा पाहिल्या तशा यावर्षीच्या शुभारंभापासून अविचारी राजकारणाचे वास्तवाची निर्मिती होऊ नये असे गृहीत धरले तर त्याचे अपेक्षित उत्तर मिळू शकेल. महाराष्ट्र सरकारच्यावतीने तरुणांच्या बेकार हातांना काम देण्याची अभिवचनं मोठ्या प्रमाणात देण्यात आली. जरुर थोडा फार परिणाम दिसून आला. पण बेकार हातांना काम मिळाल्याची अपेक्षा अल्प हाताना मिळाल्याचे दिसून आली हे मागील वर्षाचं वास्तव नाकारता येणार नाही. भारत देशात परकिय गुंतवणूक आणण्यात आमचे राज्य यशस्वी ठरल्याचा दावा करत असतानाच वस्तुस्थिती मात्र तशी समोर येताना दिसत नाही हेही वास्तव नाकारता येणार नाही. शिक्षण क्षेत्रात चाललेली बदला-बदल ही खऱ्या अर्थाने विद्याथ र्यांच्या हिताची आहे का? याची पडताळणीही या वर्षारंभात अर्थात नवीन शैक्षणिक धारण अंमलात आणण्यापूर्वी यावर गंभीरपणे विचार होणे गरजेचे आहे. शेती मालाचा भाव आणि चढ-उतार या नैसर्गिक आपत्ती मायबाप असणाऱ्या शेतकऱ्यांना भोगावे लागल्याचे दृष्य समोर येत आहे. म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने याबाबत सतर्क राहणे गरजेचे आहे असे वाटते. बेकार तरुणांना पंतप्रधान मुद्राच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या संमतीने विविध बँकांच्या माध्यमातून जाहीर केलेली योजना खऱ्या अर्थाने तरुणांच्या आशेला भरारी देणारी आहे का? याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. ज्यांचा कुणी वाली नाही दुर्दैवाने त्याला तो पतीत पावन विधातासुद्धा मदत करायला हतबल ठरतो आणि ज्या बेकार तरुणांचा हात वशिल्याच्या पदरापर्यंत घट्ट पकडला जातो तोपर्यंतच बँकेच्या अधिकाऱ्यांना त्याची जाणीव होऊ शकते हे वास्तव त्रिवार नाकारता येणार नाही. गरजेपेक्षा ज्या राज्यात वशिला श्रेष्ठ मानला जातो अशा राज्यांनी आपल्या आर्थिक सुधारणांना अधिक बळ देताना गरजूंच्या क्षमतेचा आणि सहनशीलतेचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. सरत्या वर्षात ज्या-ज्या तरुणांना बँकेकडे हात पसरुनसुद्धा रिकाम्या हातानी परत यावे लागले याची संख्या हजारो नव्हे तर लाखाच्या गुणात समोर आल्याशिवाय राहणार नाही. पंतप्रधान मुद्रा योजना ही तरुणांच्या जीवनाला कलाटणी आणि आधार देणारी योजना आहे. पण प्रत्येक बँकेच्या माध्यमातून तरुणांच्या पदरात जी निराशा पडते ती निश्चित अशी अक्षम्य आहे. धादांत खोटं बोलायचं. दिवसामागून दिवस रेटत न्यायाचे आणि रिकाम्या हाताने बँकेच्या पायरीजवळ नतमस्तक होऊन परत फिरायचे. याचे भान आर्थिक मदत देणाऱ्या सरकारनी ठेवायचे की नाही हा गंभीर प्रश्न आहे. ज्या लाडक्या बहिनींनी तुम्हाला यश मिळूवन दिले. सत्तेच्या खुर्चीवर बसविले त्या माता-भगिनीवर शहरात आणि ग्रामीण भागात होणारे अत्याचार मन सुन्न करुन टाकणारे वाटतात. बालकुमारीला येथेच्छ भोगायचे आणि तिला मारुन रस्त्यावर टाकायचे या नादान, कामवासनेनी धुंद झालेल्यांची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. कुणाचा तपास होतो तर कुणाचा तपास बासनात गुंडाळला जातो. ज्यांच्या घरचं लेकरु जीवानिशी गेलंय ते शल्य आयुष्यभर त्या कुटुंबाच्या मनात घर करुन बसतं. हे सरत्या वर्षातलं वास्तव भीषण व भयानक असे आहे. व्यापार, उदीम याबाबत व्यापाऱ्यांना योग्य ती संधी उपलब्ध होत असली तरी भावाच्या चढ-उताराने त्यांच्या व्यवसायात सुद्धा अस्थिरता निर्माण होताना दिसते. सरत्या वर्षांनी माणुसकीला काळीमा लावणाऱ्या ज्या घटना घडल्या त्याची पुर्नरावृत्ती काल प्रारंभ झालेल्या नव्या वर्षात दिसून येऊ नये ही सामान्यांची अपेक्षा आहे. राजकारणात कर्तृत्वापेक्षा, सामाजिक भावना आणि कर्तव्याला मुठमाती देणारे प्रकार वर्षाच्या शेवटच्या आठ-दहा दिवसात बीड येथे झालेल्या प्रकरणावरुन दिसून आले. राजकारणात स्थिर व्हायचे असेल तर सत्तेचा आनंद लुटायचा असेल तर चार टगे आणि गुंड जवळ बाळगावे लागतात ही आता राजकारणाची औपचारिकता झाली आहे. हे बीडच्या मस्तवाल, रगेल, नालायक राजकारण्यांवरुन दिसून येते. असे प्रकार आजपासून सुरु होणाऱ्या नवीन वर्षात घडू नये. दृष्कृत्य गाडून टाकली जावीत ही सामान्यांची अपेक्षा आहे. आपण आशा करु या याला प्रतिसाद मिळेल आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण होतील. येणारे वर्ष प्रत्येक कुटुंबाला समाधानाचे, राज्याला भरभराटीचे आणि राष्ट्राला स्वाभिमान संपन्नतेचे जावो अशी अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा सर्व वाचकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा !

# पैलू मऊ मेणाहून...



२५ डिसेंबर हा भारताचे पंतप्रधानपद भूषणवणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्मदिन. या दिवसापासून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाला सुरूवात झाली. स्वाभाविकच वर्षभर त्यांच्या कार्याची, व्यक्तित्वाची स्मरणयात्रा सजेल. अटलबिहारी यांचे व्यक्तिमत्त्व मवाळ, साहित्यप्रेमी, मृदू असले तरी आवश्यक त्या वेळी त्यांनी अतिशय कणखर भूमिका घेतल्याचेही आपण पाहिले. त्याचेच स्मरण करत त्यांना वाहिलेली ही आदरांजली.

25 डिसेंबर 2024 पासून श्री अटलबिहारी वाजपेयी यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले. 1990 च्या दशकात भारताची परिस्थिती काय होती याची आज 26 वर्षांनंतर कल्पना करणेही कठीण आहे. त्यावेळी भारत काश्मीरमध्ये अपरोक्ष युद्धाचा सामना करत होता. त्याच वेळी अमेरिका आणि चीन मिळून भारतावर सर्वंकश अण्वस्त्रचाचणी बंदी करार लादण्याचा प्रयत्न करत होते. अशा प्रकारे जागतिक शक्ती एकत्र येऊन भारताला कायम जागतिक स्तरावर दुय्यम राष्ट्राचा दर्जा देण्याच्या प्रयत्नात होती.

### मे 1998 च्या अण्वस्त्र चाचण्या

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी अणुऊर्जेचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी महान शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांच्या मदतीने भारतात अणुऊर्जा संशोधन आणि अणुऊर्जा प्रकल्प उभे केले. नेहरु नेहमीच अण्वस्त्रांच्या विरोधात होते. परंतु, भविष्यकाळात गरज पडली तर भारतापुढे अण्वस्त्रांचा पर्याय खुला रहावा म्हणून त्यांनी अणुऊर्जा प्रकल्प पूर्णपणे स्वदेशी आणि परकीय हस्तक्षेपापासून दूर ठेवले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना 1968 मध्ये अण्वस्त्रप्रसार बंदी करार अमलात आणून अमेरिकेने भारताचा अण्वस्त्र कार्यक्रम बंद करण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून इंदिरा गांधींनी 1974 मध्ये पहिली अण्वस्त्र चाचणी घेऊन भारताची अण्वस्त्र क्षमता सिद्ध केली. परंतु त्यांना तेव्हाच्या जागतिक स्थितीमध्ये आणि सोव्हिएत संघाच्या मदतीमुळे अण्वस्त्रांचा आणखी विकास करण्याची गरज भासली नाही.

1990 च्या दशकात सोव्हिएत संघाचा अस्त झाला. चीनने आर्थिक घोडदौड करत जगाला चकित केले आणि त्याच वेळी अमेरिकेने इराकवर आक्रमण करुन जगावर आपली एकाधिकारशाही लादली. त्याच सुमारास पाश्चिमात्य राष्ट्रांनी युगोस्लाव्हियासारख्या देशाचे विघटन केले. अनेक भारतीय संरक्षणतज्ज्ञांच्या मते, बगदादनंतर अमेरिकेची वक्रदृष्टी मुंबईकडे वळणार, अशी साधार भीती व्यक्त केली गेली. आमच्यापैकी अनेकांनी तत्कालिन राज्यकर्त्यांना उघडपणे अण्वस्त्र बनवण्याचा सल्ला दिला. परंतु, आर्थिक प्रतिबंद लादले जाण्याची भीती आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे भारताने अण्वस्त्रचाचण्या केल्या नाहीत. त्यातच सर्वंकष अण्वस्त्रचाचणी बंदी करार अमलात आणण्याच्या हालचाली सुरू झाल्या. चीनच्या सल्ल्यामुळे या करारात असे एक कलम होते की, यात सामील न होणाऱ्या देशांनादेखील हा करार बंधनकारक होणार होता. अशा वेळी अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारताने 11 आणि 13 मे 1998 रोजी केवळ अणुबाँब नव्हे, तर हायड्रोजन बाँबचीही चाचणी घेऊन संपूर्ण जगाला आपली संरक्षणक्षमता दाखवून दिली. अण्वस्त्र उघडपणे बनवण्याच्या निर्णयाबरोबरच वाजपेयी यांनी जगाला आश्वासन दिले की, भारताची अण्वस्त्रे केवळ बचावासाठी आहेत. भारत कधीही अण्वस्त्रांचा प्रथम उपयोग करणार नाही.

कर्नल (नि.) अनिल आठल्ये
ज्येष्ठ अभ्यासक

अण्वस्त्र चाचण्यांच्या यशानंतर जगभरातील भारतीयांनी आनंदोत्सव साजरा केला. परंतु, दुर्दैवाने सोनिया गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने अण्वस्त्र चाचण्यांचा विरोध केला. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे 1974 मध्ये इंदिरा गांधी यांनी अणुचाचणी घेतली, तेव्हा सर्व पक्षांनी त्यांना पाठबा दिला होता. आज 26 वर्षांनंतर सहावलोक केल्यास दिसते की, काँग्रेसने तेव्हाच राष्ट्रवादापासून फारकत घेतली. तेव्हापासूनच काँग्रेसची अधोगती सुरू झाली, असे म्हणता येते. अण्वस्त्र बनवण्याच्या निर्णयापश्चात अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लादले. देशातील अनेक तथाकथित अर्थतज्ज्ञांनी त्यावेळी भारताची अर्थव्यवस्था या निर्बंधांपुढे टिकणार नाही, असे भाकीत केले होते. भारताला दिली जाणारी एक बिलियन डॉलरची आर्थिक मदत रद्द करण्यात आली. परंतु, वाजपेयी सरकारने अनिवासी भारतीयांच्या मदतीने 'रिसर्जंट इंडिया' नावाचे रोखे जारी केले. त्याद्वारे भारतात चार बिलियन डॉलर जमा झाले. आर्थिक संकट येणार, अशी आवई उठवणाऱ्यांना यामुळे चोख उत्तर मिळाले. त्याच वेळी पाकिस्तानही अण्वस्त्रधारी बनणार, हे गृहीत धरुन वाजपेयी सरकारने आपल्या अणुचाचण्यांची सांगड पाकिस्तानशी नव्हे, तर चीनच्या अण्वस्त्रक्षमतेशी घातली. याद्वारे भारताने आपण आशिया खंडामध्ये चीनशी स्पर्धा करत आहोत, हे सर्व जगापुढे अधोरेखित केले. परिणामस्वरुप, आज पाश्चिमात्य जग चीनच्या अधिपत्याला आव्हान देण्यासाठी भारताकडे पाहत आहे. वाजपेयींच्या काळात भारत अण्वस्त्रधारी देश बनला नसता तर ही परिस्थिती उद्भवलीच नसती.

### लाहोर शांतीप्रक्रिया आणि कारगील

वाजपेयी नेहमी म्हणत की, आवडीचे मित्र शोधू शकतो पण आपण शेजारी बदलू शकत नाही. दोन्ही देश अण्वस्त्रधारी झाल्यानंतर भारत-पाकिस्तान युद्धाची शक्यता कमी झाल्यामुळे पाकिस्तानशी स्थायी शांततेसाठी वाजपेयी 19 फेब्रुवारी 1999 रोजी लाहोरला गेले. तिथे त्यांनी मिनार ए पाकिस्तानला भेट देऊन भारताने 1947 ची फाळणी आणि पाकिस्तानचे स्वतंत्र अस्तित्व यावर शिक्कामोर्तब केले. अशा प्रकारे त्यांनी भारत-पाकिस्तानदरम्यान शांततेचा नवा अध्याय सुरू करण्याचा प्रयत्न केला. परंतु, पाकिस्तानातील कट्टरवादी आणि पाकिस्तानी सैन्याने दोन्ही देशांच्या अण्वस्त्रसज्जतेचा फायदा घेऊन त्या आड काश्मीरचा प्रश्न सोडवता येईल, असा चुकीचा आडाखा बांधला. वाजपेयी पाकिस्तानमध्ये असतानाच पाक सैन्याने कारगील क्षेत्रात घुसखोरी करुन प्रत्यक्ष ताबारेषेच्या पलिकडे अनेक ठाणी उभारली. बर्फ वितळल्यानंतर मे महिन्यात ही बाब उघड झाली. पाकिस्तानच्या या दगाबाजीला भारताने सज्जड उत्तर दिले आणि अत्यंत कठीण परिस्थितीत सर्व ठाणी ताब्यात घेतली. या युद्धात भारताने हवाई दलाचा पूर्णपणे उपयोग केला. पाकिस्तानला त्याची अपेक्षा नव्हती. कारगील युद्धाच्या काळात संपूर्ण देश भारतीय सैन्याच्या पाठिशी उभा होता. या वेळीही काँग्रेसने सैन्याला पाठबा देण्याऐवजी वाजपेयी सरकारवरच टीका केली. सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्यासाठी हा हल्ला घडवून आणला, असे आरोपही केले. पोखरणच्या अण्वस्त्र चाचण्यांनंतर काँग्रेस देशविरोधी असल्याची छबी निर्माण झाली होती. त्यावर कारगील युद्धादरम्यान शिक्कामोर्तब झाले.

### लोकसभेवर दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन पराक्रम

13 डिसेंबर 2001 रोजी काही दहशतवाद्यांनी भारतीय संसदेच्या आवारात घुसून खासदारांना आणि नेतृत्वाला मारण्याचा डाव रचला होता. देशाच्या सुदैवाने संसदेच्या आवारातील सुरक्षारक्षकांनी हा हल्ला परतवून लावला. प्रत्युत्तरादाखल वाजपेयी सरकारने सर्व सैन्यक्षमता एकत्र करुन पाकिस्तानवर आक्रमण करण्याची पूर्ण तयारी केली. अशा वेळी जागतिक दबाव आणि पाकिस्तानने दहशतवाद्यांवर अंकुश ठेवण्याचे आश्वासन दिल्यानंतर जवळपास आठ महिन्यांनी सैन्य माघारी फिरले. एप्रिल 2003 मध्ये पाकिस्तानचे तत्कालिन अध्यक्ष जनरल मुशर्रफ भारतभेटीवर आले आणि भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याचा आणखी एक प्रयत्न वाजपेयी यांनी केला.

### जादूगार वाजपेयी

वाजपेयी यांच्या काळात भारताने अमेरिकेशी संबंध सुधारले आणि जिहादी दहशतवादाविरुद्ध भारत-अमेरिका आणि इस्रायल अशा तीन देशांमध्ये मैत्रीचा एक त्रिकोण बनवला. हे करत असतानाच भारत-इराण आणि रशिया यांच्याशीदेखील संबंध वाढवून भारताने सुन्नी, वाहबी इस्लामविरोधात एक नवी फळी निर्माण केली. सामरिक दृष्टीचे हे सर्व उपाय करत असतानाच आर्थिक स्तरावर जागतिक व्यापार संघटनेत भारत, चीन आणि ब्राझील यांनी एकत्र येऊन विकसनशील राष्ट्रांची एक संघटना बनवली. त्यामध्ये आज दक्षिण आफ्रिका आणि रशिया सामील झाले आहेत.

### संक्षेप

1947 पासून भारताच्या सर्वच पंतप्रधानांना युद्धांचा सामना करावा लागला आहे. नेहरुंच्या काळात 1947 मध्ये काश्मीर आणि 1962 मध्ये चीनशी युद्धे झाली. 1965 च्या युद्धावेळी शास्त्री पंतप्रधान होते. त्यानंतर 1971 मध्ये इंदिरा गांधी यांनी आपली सामरिक शक्ती, राजकीय इच्छाशक्ती दाखवून पाकिस्तानवर निर्भेळ विजय मिळवला. वाजपेयी आपल्या दीर्घ राजकीय प्रवासात या सर्व घटनांचे साक्षीदार होते. त्यामुळे पंतप्रधानपदाच्या काळात त्यांनी लढाई जकण्याबरोबरच शांततेच्या दृष्टीनेही प्रयत्न केले. आज आपण वाजपेयींची जन्मशताब्दी साजरी करत आहोत. तेव्हा भारत परचक्रापासून सुरक्षित असल्याचे श्रेय त्यांच्या दूरदृष्टीला जाते.




## राशीभविष्य


- **मेष** : कामांबाबत उत्साह राहील. महत्त्वाच्या भेटीतून अपेक्षित साध्य करू शकाल. बाकी चिंता नको.
- **वृषभ** : जुनी येणी सहज वसूल होतील. व्यवसायात बदलाला अनुकूलता राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : अंगभूत कलागुणांचा विकास होईल. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. हितसंबंध आणखी दृढ होतील.
- **कर्क** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. व्यवसायात अधिक लक्ष द्यावं लागेल. धावपळ, दगदग होणार आहे.
- **सिंह** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. पती–पत्नीत सामंजस्य रहायला हवं. कारकिर्दीत नवी संधी लाभेल.
- **कन्या** : कौटुंबिक ताण कमी होईल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळेल.
- **तूळ** : हाती घेतलेली कामं पूर्ण करावी. ज्ञानदानाच्या क्षेत्रात नव्या संधी लाभतील. अपत्याची चिंता राहील.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. आर्थिक करार लांबणीवर पडतील. कौटुंबिक प्रश्न उद्‌भवतील.
- **धनु** : सरकारी कामांना गती येईल. सहकार्याची जाणीव ठेवावी. प्रलंबित कामांना गती येणार आहे.
- **मकर** : नोकरीत सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. विचारानं रहावं.
- **कुंभ** : परिपूर्ण ज्ञानासाठी प्रयत्न करावे. जुन्या आठवणींमध्ये फार रमू नका. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **मीन** : प्रलंबित कामांना गती येईल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. आर्थिक आवक उत्तम राहील.

## २ जानेवारी — दिनविशेष

- **१९५४** : राष्ट्रपतीपदी विराजमान असताना डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी 'भारतरत्न' या सर्वोच्च किताबाची सुरूवात केली.
- **१९४४** : महाराष्ट्रातील थोर सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचं निधन.
- **२०१५** : पाकिस्तानी सैन्याने शस्त्रसंधीचा भंग करत जम्मू–काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवरील १३ भारतीय चौक्यांवर गोळीबार केला.
- **२०१८** : महिलांसाठी हज यात्रा सुकर. पुरुष पालक बरोबर असण्याची 'महरम' ची प्रथा संपुष्टात

## आरोग्यमंत्र — थंड, गरम दुधाचे लाभ

चहा, कॉफीऐवजी दूध पिणं केव्हाही चांगलं, असं अनेकांचं मत असतं. याचं कारण दुधातील पोषक तत्त्व. दुधात कॅल्शियम, प्रोटीन, पोटॅशियम, फॉस्फरस आणि व्हिटॅमीन बी १२ यासारखी पोषक तत्त्वं भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. एवढंच नाही तर रोज एक ग्लास दूध घेतल्यास त्याद्वारे शरीराची त्या त्या दिवसाची पोषक तत्त्वांची गरज पूर्ण केली जाते. असं असलं तरी थंड दूध पिणं चांगलं का गरम दूध पिणं चांगलं असा प्रश्न मनात असतो. त्यादृष्टीने आहारतज्ज्ञांनी दिलेली महत्त्वपूर्ण माहिती विचारात घ्यायला हवी.



सहजपणे पचन होण्याच्या दृष्टीने गरम दूध महत्त्वाचं ठरतं. गरम दुधामध्ये लॅक्टोज कमी होतात. त्यामुळे गरम दूध घेतल्यास पोटदुखी, जुलाब यासारख्या समस्या निर्माण होत नाहीत. झोप न येण्याच्या समस्येवरही गरम दूध लाभदायक ठरतं. रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास गरम दूध घेतल्यास शांत झोप येण्यास मदत होते. ॲसिडिटीची समस्या असेल तर मात्र थंड दूध घ्यायला हवं. ॲसिडिटीमुळे पोटात होणारी जळजळही थंड दुधाने दूर होते. विशेषत: जेवणानंतर अर्धा ग्लास दूध घेतल्यास ॲसिडिटीपासून आराम मिळू शकतो. थंड दुध प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत होते असं संशोधनातून दिसून आलं आहे. थंड दुधातील कॅल्शियममुळे मेटाबॉलिज्मचा स्तर वाढतो. त्यामुळे शरीरातील कॅलरीज वेगाने कमी होण्यास मदत मिळते. थंड दुधाचा हा लाभही लक्षात घेण्याजोगा आहे.

## महत्त्वपूर्ण काही... — वाऱ्याचा वेग

सर आयझॅक न्यूटन यांच्या गुरूत्वाकर्षणाच्या शोधाबद्दल साऱ्यांनाच माहीत आहे. परंतु त्यांनी लहान वयात वाऱ्याचा वेग मोजण्याचा केलेला प्रयत्नही लक्षवेधी होता. आयझॅक यांना गणिताची गोडी वाटू लागली असतानाच सावत्र वडिलांचं निधन झालं. त्यानंतर आयझॅक यांना घेऊन आई लिंकनशायरला परत आली. तिनं आयझॅकचं शिक्षण बंद करून त्याला शेताच्या कामाला लावलं. एक दिवस दुपारी आयझॅक दमुनभागून झाडाच्या सावलीत बसले होते. त्यावेळी वारा वाहत होता आणि अशा स्थितीत आयझॅक याचं विचारचक्र सुरू होतं. त्यावेळी आपण वाऱ्याचा वेग मोजावा, असा विचार त्यांच्या मनात आला. अर्थात, त्यासाठी कुठलंही साधन उपलब्ध नव्हतं. मग आयझॅक यांनी एक प्रयोग केला. त्यांनी वाऱ्याच्या दिशेनं उडी मारली. उडी जिथं पडली त्या ठिकाणी एक दगड ठेवला. त्यानंतर वाऱ्याच्या उलट दिशेनं उडी मारली. ही उडीही जिथं पडली तिथं एक दगड ठेवला. अशा रितीने ठेवण्यात आलेल्या दोन दगडांमधील अंतर दोरीच्या सहाय्यानं मोजलं. हा प्रयोग आयझॅक यांच्या मामानी पाहिला आणि त्यांना आयझॅक यांच्या कुशाग्र बुध्दीमत्तेची कल्पना आली.

## सल्ला मोलाचा — महिलांनो, हृदय जपा

महिलांमध्ये हृदयविकाराचा धोका वाढतोय. त्यातही तरूण महिलांना याचा जास्तच धोका आहे. हृदयविकाराचा धोका टाळण्यासाठी महिलांनी काही आरोग्यदायी सवयी अंगी बाणवायला हव्यात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे धूम्रपानाची सवय असेल तर ती सोडून द्या. दुसरं म्हणजे तुमचा शरीर द्रव्यमान सूचकांक म्हणजेच बॉडी मास्क इंडेक्स योग्य असायला हवा. दर आठवड्याला किमान अडीच तास तरी व्यायाम करायला हवा. 'इंडियाना युनिव्हर्सिटी ऑफ पब्लिक हेल्थ' मध्ये याबाबत संशोधन करण्यात आलं. या अभ्यासासाठी गेल्या वीस वर्षात सुमारे ७० हजार महिलांचं निरिक्षण करण्यात आलं. या काळात ४५६ महिलांना हृदयविकाराचा झटका आला तर ३१,६९१ महिलांना हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल अशा समस्या निर्माण झाल्या. आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब केलेल्या महिलांमध्ये हृदयविकारचा झटका येण्याचं प्रमाण ९२ टक्क्यांनी कमी असल्याचं संशोधकांना आढळून आलं तर हृदयविकाराला कारणीभूत ठरणारे इतर विकार होण्याचं प्रमाणंही ६६ टक्क्यांनी घटलं होतं.

## पंचांग

**गुरूवार, २ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष शु. ३, नक्षत्र : श्रवण
चंद्रराशी : मकर, हर्षण योग
सूर्योदय : ७.१२, सूर्यास्त : ६.१२

## फॉरवर्डस

तणावग्रस्त अवस्थेतील चिंतन...


**जिंदगी वक्त के बहाव में हैं, यहाँ हर आदमी तनाव में हैं...हमने लगा दी पानी पर तोहमत, यह नहीं देखा कि छेद नाव में हैं!**

## वाचा तर खरं

स्वयंपाक करताना भाजणं, कापणं, हातावर वाफ येणं अशा घटना वारंवार घडतात. भाजल्याने होणाऱ्या वेदना, नंतर बराच काळ होणारी जळजळ, येणारे फोड आणि नंतर पडणारे डाग हे सगळंच त्रासदायक असतं. मात्र काही उपाय योजले तर हा त्रास कमी होऊ शकतो. भाजल्यास सर्वप्रथम तो भाग पाण्याखाली धरावा. हळदयुक्त पाण्याने हा भाग पुसल्यासही वेदना कमी होतात आणि संसर्गाचा धोका रहात नाही. जळजळ थांबावी यासाठी त्या जागी खोबरेल तेल लावल्यानेही फायदा होतो.

## भटकंती — मणीपूरचं मनोहारी सौंदर्य

दोस्तांनो, नववर्षाच्या प्रारंभी भटकंतीसाठी एखाद्या ऑफबीट ठिकाणाच्या शोधात असाल तर उत्तर–पूर्वेकडच्या मणीपूरची निवड करायला हवी.निसर्गसौंदर्य, वन्यजीवन, तरंगणारी बेटं यामुळे मणीपूर पर्यटकांचं आवडतं स्थान बनून गेलं आहे. उत्तर–पूर्वेकडच्या राज्यांमध्ये देशाच्या इतर भागांच्या तुलनेत लवकर सूर्योदय होतो. त्यामुळे उगवत्या सूर्याचं दर्शन घेण्यासाठी आणि उगवतीच्या असंख्य छटा टिपण्यासाठी मणीपूरला भेट द्यायलाच हवी. इंफाळ ही मणीपूरची राजधानी. इंफाळ हे उत्तर–पूर्वेकडच्या सुनियोजित शहरांपैकी एक. मणीपूर विकासाबाबत थोडं मागे असलं तरी इथल्या निसर्गसौंदर्याची सर कशालाही नाही. इंफाळपासून ४६ किलोमीटर अंतरावर 'सेंड्रा' नावाचं एक बेट आहे. इथल्या 'लोकतक' नावाच्या तलावात मोटरबोटने विहार करता येतो. निळ्याशार पाण्याच्या या तलावात बोटीतून विहार करण्याचा आनंद निराळाच!याच तलावात तरंगती बेटंही आहेत. इंफाळला विमानाने जाता येईल. इथलं विमानतळ शहरापासून आठ किलोमीटर लांब आहे. इथून इंफाळला जाण्यासाठी टॅक्सी मिळते. इंफाळ रेल्वेमार्गाने जोडलेलं नाही. दिमापूर हे स्थानक इंफाळपासून २६० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे इथे विमानाने जाणं योग्य ठरतं.



## खेचाखेची — खुणेमुळे...

**रामराव** : काय हो श्यामराव, मी बरेच दिवस एक गोष्ट विचारीन म्हणतो आहे. तुमच्या प्रत्येक चपलेवर पुढच्या बाजूला खूण असते ती कशासाठी?

.


**श्यामराव** : त्याचं काय आहे रामराव, एक तर या खुणेमुळे चपला बदलण्याचा धोका टळतो आणि दुसरं म्हणजे चप्पल पायात सरकवताना कोणती बाजू पुढे आहे ते लगेच समजतं.

## वेगळे काही

हिमाचलमधील मलाणा हे गाव एक वेगळी ओळख जपतं. आपल्या प्राचीन संस्कृतीचा सार्थ अभिमान असणारे इथले नागरिक आजही अनेक प्रथा पाळतात. त्यातीलच एक प्रथा म्हणजे या गावात पर्यटक कोणत्याही वस्तूला हात लावू शकत नाहीत. तुम्ही एखाद्या दुकानात गेला आणि सामानाची मागणी केली तर दुकानदार वस्तू थेट तुमच्या हातात देणार नाही तो वस्तू काऊंटरवर ठेवेल. तुमच्या हातून थेट पैसे न घेता तेही काऊंटरवर ठेवायला सांगेल. इथले निवासी स्वत:ला सिकंदरच्या सेनेचे वंशज समजतात. येथील बोलीभाषेतील अनेक शब्द ग्रीक आहेत. या गावामध्ये अकबराची पूजा केली जाते. अकबराची पूजा होणारं हे एकमेव गाव आहे.

## फॅशन पॅशन — ट्रेंडी लूकसाठी...

मैत्रिणींनो, जीन्स असो वा लेहंगा, प्रत्येक पेहराव इंडो–वेस्टर्न पद्धतीने कॅरी करण्याचा ट्रेंड सध्या लोकप्रिय ठरतो आहे. यासाठी लेअरिंगचा फंडा वापरला जातो. बॉलिवूडमधल्या अभिनेत्रींकडून हा लूक कॅरी करण्याचे धडे घेता येतील.



✽ मध्यंतरी अंकिता लोखंडेने फॅशन डिझायनर कनिका कपूरने डिझाइन केलेला चिकनकारी कलेक्शनमधला पिवळ्या रंगाचा केप घातला होता. व्हाईट टॉप आणि ब्लू जीन्सवर लेअरिंग म्हणून हा केप कॅरी केला. अशा प्रकारचा केप लेहंगा, साडी, स्कर्ट यापैकी कशावरही घालता येईल. ✽ अनामिका खन्नाने डिझाईन केलेला श्रग सोहा अली खानने लुंगी स्टाईल स्कर्ट, लाँग स्लीव्ह जॅकेटवर कॅरी केला. यामुळे ती आणखी स्टायलिश दिसली. तुम्ही स्कर्ट आणि जॅकेट अशा लूकवर ट्रेंडी श्रग घालू शकता. ✽ करिश्मा तन्नाने साईड प्लेट लुंगी स्कर्टवर क्रॉप टॉप आणि पायघोळ श्रग घातला. यामुळे लूकला चार चाँद लागले. असा श्रग तुम्ही कशावरही घालू शकता. ✽ डेझी शाहने डिझायनर शमिताशाने डिझाईन केलेला लेहंगा–चोली कॅरी केला होता. त्यावर पायघोळ जॅकेट घातल्यामुळे इंडो–वेस्टर्न लूक मिळाला.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

## ट्रॅफिक सिग्नल प्रकल्पाला द्वितीय क्रमांक



**रांजणी :** पंचायत समिती आंबेगाव तालुका शिक्षण विभाग व गणित, विज्ञान अध्यापक संघ आंबेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मंचर येथिल महात्मा गांधी विद्यालयात दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात थोरांदळे येथिल आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्रणय अशोक पुंडे व ऋग्वेद बाबासाहेब गायकवाड यांनी सादर केलेल्या ट्रॅफिक सिग्नल लाईट या प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाल्याची माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका इंदू नाचर यांनी दिली. या उपक्रमाची तयारी करण्यासाठी अनिकेत आवटे व संदीप शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेजचे संस्थापक नीलेश छडवेलकर व महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य उत्तम आवारी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. थोरांदळे येथील विद्यार्थ्यांनी ४ प्रकल्प सादर केले होते. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे गटशिक्षण अधिकारी उषा मसळे, केंद्रप्रमुख मनोहर सांगळे, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी विशेष अभिनंदन केले आहे.

## सामाजिक प्रबोधनासाठी वाचनसंस्कृती आवश्यक



**खेड :** वाचनसंस्कृतीच्या विकासाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. म्हणून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर वाचनातून वाचनसंस्कृती विकसित करावी व नवीन वर्षात वाचन संकल्प करावा असे आवाहन हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत बुधवारी (दि १) सामूहिक वाचन व एकदिवसीय वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ शिंदे बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. राजेंद्र शिरसी, डॉ. बाळासाहेब अनुसे, ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर, प्रा. रौनक भिसे यावेळी उपस्थित होत्या. सामूहिक वाचन या उपक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनुसार पुस्तके वाचण्याचा सामूहिक उपक्रम राबविण्यात आला. मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने १ ते १५ जानेवारी दरम्यान वाचन पंधरवाडा उपक्रम राबविण्यात येणार असून पुस्तक प्रदर्शन, वाचन संवाद व पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रौनक भिसे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

## जेजुरीत दारू नको दूध प्या उपक्रम



**जेजुरी :** हभप बंडातात्या कराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य व्यसन मुक्त युवक विकास संघाच्या वतीने वर्षाच्या शेवटच्या दिवशी दारू नको दूध प्या या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जेजुरी शहरात गणेश उत्सवा वेळी डीजे मुक्त उत्सव साजरा करणाऱ्या गणेश मंडळांना जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. जेजुरी गडाच्या पायथ्याशी सलग पंधराव्या वर्षी जेजुरी व्यसन मुक्त संघाच्या वतीने वर्षाच्या शेवटच्या दिवशी दारू पीवून आयुष्य उद्ध्वस्त करण्याऐवजी दूध प्या व आपली संस्कृती जपून निर्व्यसनी बना, हा संदेश देवून व्यसन मुक्त संघाच्या वतीने दारू नको दूध प्या हा उपक्रम राबविण्यात आला. व्यसन मुक्त संघाच्या वतीने जेजुरी शहरात डीजे मुक्त गणपती हे अभियान राबविण्याऱ्या सुवर्ण स्टार मित्र मंडळ, जननी मित्र मंडळ, उघडा मारुती मित्र मंडळ व एकता मित्र मंडळ या गणेश मंडळांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन व्यसन मुक्त संघाचे जिल्ह्याचे उपाध्यक्ष आनंद नाईक, तालुका अध्यक्ष मच्छिंद्र नागरगोजे, बाळासाहेब काळे, तुषार देशमुख, अनंत देशमुख, विशाल बारसुडे, तानाजी जगताप, प्रिन्स नागरगोजे, सचिन शेलार, संकेत कारंडे, सागर चीकने, रमेश पासवान, तनाया देशमुख, अर्या देशमुख, समर्थ नाईक आदींनी केले.

# उसळला लाखोंचा जनसागर

## कोरेगाव भीमा येथे विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे आज २०७ वा शौर्यदिन साजरा केला जात आहे. कोरेगाव भीमा इथल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायांचा जनसागर उसळला आहे. या ऐतिहासिक विजय स्तंभाला आकर्षक फुलांची सजावटही करण्यात आली आहे. पुण्यातील कोरेगाव भीमा या ठिकाणी शौर्य दिनानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे. तसेच पोलिसांचा देखील मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा या ठिकाणी ५ हजार पोलीस सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आले आहेत.

कोरेगाव भीमा येथे शौर्यदिनी ऐतिहासिक विजयस्तंभ शौर्यदिन कार्यक्रमानिमित्त प्रशासनाकडून नियोजनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यावर्षी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या धर्तीवर ऐतिहासिक विजयस्तंभास फुलांची सजावट करण्यात आली असून त्यासाठी ७० हजार कृत्रिम आणि १ हजार किलो खऱ्या फुलांचा वापर करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास शौर्यदिनी होणाऱ्या मानवंदना कार्यक्रमादरम्यान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात येते. तब्बल वीस गुंठे जागेमध्ये असलेला ७५ फुटी ऐतिहासिक विजयीस्तंभ यावर्षी कृत्रिम व खऱ्या फुलांनी सजविण्यात आला आहे. या स्तंभावर फुलांनी अशोकचक्र, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आणि संविधानाचे तैलचित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.



कोरेगांव भीमा — विजयस्तंभस्थळी छत्तीसगडहून दोनशे अनुयायांनी विजयस्तंभस्थळी अभिवादन केले. कोरेगाव भिमा समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे व सुवर्णा डंबाळे यांनी सर्व अनुयायांचे स्वागत केले.

### मोठा बंदोबस्त

● कोरेगाव भीमा या ठिकाणी पाच हजार पोलीस कर्मचारी, सातशे पन्नास पोलिस आधिकारी तैनात करण्यात आले आहेत. यासोबतच एक हजार होमगार्ड आणि आठ कंपन्या काम करत आहेत. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ५० पोलिस टॉवर, १० ड्रोन आणि चोरी रोखण्यासाठी विशेष पोलिस पथक आहे, अशी माहिती पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.



### आनंदराज आंबेडकर यांची भेट

● रिपब्लीकन सेनेचे आनंदराज आंबेडकर यांनी विजयस्तंभाला भेट दिली. आनंदराज आंबेडकर यांनी विजयस्तंभाला अभिवादन केले. भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, कोरेगाव भीमा विजय रणस्तंभ सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष सर्जेराव वाघमारे, रिपब्लिकन कामगार संघटनेचे अध्यक्ष युवराज बनसोडे, रिपब्लिकन विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विवेक बनसोडे, संजीव बावधनकर, संजय देखणे, विशाल म्हस्के यांसह आदी उपस्थित होते.

### सामाजिक व राजकीय इतिहासाला सुरुवात

● आपल्या देशात हजारो वर्ष राजकीय गुलामी होती पण कोरेगाव भीमाच्या लढाईत गुलामी संपली. भारताच्या स्वातंत्र्याच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासाला येथून सुरुवात झाली. त्यामुळे या दिवशी लाखो नागरिक विजयस्तंभ येथे अभिवादन करण्यासाठी येत असल्याने मी आजचा दिवस आनंदाचा मानत असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अभिवादन केले.

# वृद्ध दाम्पत्याला मारहाण करून लुटले

## शिरोली सुलतानपूर येथील धक्कादायक प्रकार : नागरिक भयभीत


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील शिरोली सुलतानपूर येथील जगदाळेमळा येथे राहत असलेल्या वृद्ध दांपत्याला मारहाण करून सुमारे बारा तोळे वजनाचे सोनेचे दागीने व रोख एक लाख वीस हजार रुपये रक्कम चोरट्यांनी लंपास केली. ही घटना सोमवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास घडली.

दरम्यान, वृद्ध दांपत्य जबर जखमी झाल्याने त्यांच्यावर नारायणगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वृद्ध महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून कानातील दागिने चोरट्यांनी ओरबडून नेल्याने दोन्ही कानाला जबर दुखापत झाली आहे. तसेच डोक्याला लाकडी दांडक्याने जबर मारहाण केल्याने डोक्याला व कानाला बारा टाके पडले आहेत.

याबाबत समजलेली माहिती अशी की, शिरोली सुलतानपूर येथील जगदाळे मळ्यात तुकाराम गणपत आतकरी (वय ७२ वर्षे ) व त्यांची पत्नी जिजाबाई तुकाराम आतकरी (वय ६५ वर्षे) हे दोघेच जगदाळे मळ्यातील बंगल्यात राहत असतात. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्यावर पाळत ठेवून सोमवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास किचनच्या दरवाजाचा कडीकोंड्या तोडून घरात प्रवेश केला व लाकडी दांडक्याने दोघा वृद्धपती पत्नीला जबर मारहाण करण्यास सुरुवात केली. महिलेच्या गळ्यातील दागिने हिसकावून घेतले. तसेच कानातील दागिने निघत नसल्यामुळे अक्षरशः ते ओरबडून काढल्याने दोन्ही कान तुटले आहेत. वृद्ध महिलेच्या हातातील सोन्याची अंगठी तसेच लॉकर मधील दागिने रोख व रोख रक्कम एक लाख वीस हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. चोरट्यांनी एकूण एक लाख वीस हजार रुपये रोख रक्कम सुमारे १२ तोळे सोन्याचे दागिने लंपास करून पोबारा केला. वृद्ध दांपत्याला जबर मारहाण केल्याने, ते दोघेही बेशुद्ध पडले होते. काही वेळाने तुकाराम गणपत आतकरी शुद्धीवर आल्यावर त्यांनी बाजूच्या घरी फोन करून घडलेला प्रकार सांगितला. त्यामुळे बाजूची लोक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व याबाबतची माहिती नारायणगाव पोलीस स्टेशनला दिल्याने काही वेळातच नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून डॉग स्कॉड व दरवाज्याचे ठसे घेण्यासाठी "फिंगरप्रिंट एक्सपर्ट" यांना पाचरण केले.

सुलतानपूर येथील या घटनेमुळे परिसरातील लोक भयभीत झाले असून, पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी केली जात आहे. चोरट्यांनी मारहाण केलेले वृद्ध जोडपे यांच्यावर नारायणगाव येथील खाजगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. २००७ साली याच गावात चोरट्यांनी किसन गोपाळ आतकरी यांची हत्या केली होती. त्यानंतर पुन्हा या परिसरामध्ये अशा प्रकारच्या दरोडा पडल्याने स्थानिक नागरिक भयभीत झाले आहेत.




सुलतानपूर येथील वृद्ध दांपत्याला अज्ञात चोरट्यांनी जबर मारहाण केल्याने नारायणगाव येथील खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. (छायाः सुरेश वाणी)

### चोरट्यांनी पाळत ठेवल्याचा संशय

● या एवढ्या मोठ्या बंगल्यामध्ये हे दोघेच वृद्ध दाम्पत राहत आहे, याबाबतची या चोरट्यांनी रेकी केली असावी व पाळत ठेवून हा दरोडा टाकला असावा, असा संशय स्थानिक नागरिकांना आहे. बाजूला इतर घरे असताना याच घरी दरोडा पडल्याने लोकांचा रेकीचा संशय बळावला आहे. चोरट्यांनी घरातील बॅगा व त्यातील कागदपत्रे बाजूला शेतात फेकून दिले. तसेच वृद्ध दाम्पत्यांना ज्या दांडक्याने मारहाण केली ते दांडके सुद्धा त्याच ठिकाणी टाकून ते पळून गेले.

## रांजणगावात नववर्षानिमित्त भाविकांची मांदियाळी





■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव :** अष्टविनायकापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव गणपती, ता.शिरुर येथे महागणपतीच्या दर्शनासाठी बुधवारी नववर्षानिमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली होती, अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर व उपाध्यक्ष संदीप दौडकर यांनी दिली.

पहाटे ५ वाजता श्रीं चा अभिषेक व महापूजा झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. दुपारी १२ वाजता मुख्य विश्वस्त ओमकार देव यांच्या हस्ते आणि देवस्थानचे सचिव तुषार पाचुंदकर यांच्या उपस्थितीत महापुजा संपन्न झाली. येथे येऊन नव्या वर्षाची सुरुवात करण्याची परंपरा दोन तीन पिढ्यांपासून कायम ठेवणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे, यंदाही हे चित्र ठळकपणे नजरेत भरत होते. नववर्षाची सुरुवात महागणपतीच्या दर्शनाने करण्यासाठी जिल्हा परिषद शाळा व महाविद्यालय यांच्या शैक्षणिक सहली, रांजणगाव एमआयडीसीतील विविध कंपन्यांचे कामगार,अधिकारी आणि कोरेगाव भिमा येथे शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभ अभिवादनासाठी जात असलेले अनुयायी यांनी दर्शनासाठी मोठया प्रमाणात गर्दी केल्याचे दिसून आले.

सकाळी नाशिकचे पोलिस अधीक्षक आदित्य मिरघेकर यांनी सपत्नीक अभिषेक करत महागणपतीचे दर्शन घेतले. तसेच आज दिवसभरात हजारो भाविकांनी श्रींचे मनोभावे दर्शन घेतले. भाविकांच्या अलोट गर्दीमुळे रांजणगावला अक्षरशः यात्रेचे स्वरूप आले होते. रांजणगाव एमआयडीसीचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर व परिसरात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** पिंपरी चिंचवड आयुक्तालय अंतर्गत येत असलेल्या महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकाचा कर्तव्यावरती असतानाच अपघाती मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. जितेंद्र गिरनार असं त्यांचं नाव असून, ते कर्तव्य बजावत असताना झालेल्या भीषण अपघातात त्यांचा मृत्यू झाला आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतावेळी कोणतीही दुर्घटना घडू नये, म्हणून पीएसआय गिरनार हे चाकण एमआयडीसीमध्ये पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी महिंद्रा कंपनीच्या समोरुन ते कारमधून निघाले असताना समोर एक कंटेनर उजव्या लेन मधून चालला होता, मात्र, कंटेनर चालक अचानकपणे डाव्या लेनमध्ये घुसला आणि पीएसआय गिरनार यांच्या गाडीची कंटेनरला जोराची धडक बसली. या घटनेमध्ये गिरनार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या घटनेने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात हळहळ व्यक्त केली जाती आहे. या घटनेने गिरनार यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



## इंदापूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाची धमाकेदार कामगिरी

**इंदापूर :** इंदापूर पोलीस ठाण्याच्या गुन्हेशोध पथकाने शेटफळ हवेली गावच्या हद्दीत पाठलाग करत १९ लाख ९२ हजार ६१५ रुपये किंमतीचा १३२ किलो ८४१ ग्रॅम वजनाचा गांजा पकडला आहे.

या प्रकरणात गुन्ह्यात वापरण्यात तीन लाख रुपयांच्या टेम्पोसह एकूण २३ लाख २२ हजार ६१५ रुपयांचा मुद्देमाल व दोन आरोपींना ही ताब्यात घेतले आहे,अशी माहिती बारामतीचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी पत्रकार परिषदेत आज ( दि.२८) दिली.ब

त्यांनी सांगितले की,दि.२६ डिसेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली आहे. नवनाथ राजेंद्र चव्हाण (वय ३० वर्षे, रा. शेटफळ हवेली ता.इंदापूर), शिवाजी जालिंदर सरवदे (वय ३० वर्षे, रा. निरा नरसिंहपूर ता.इंदापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. इंदापूरचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर राऊत, गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन मोहिते, फौजदार पुंडलिक गावडे, सहाय्यक पोलीस फौजदार प्रकाश माने,सहाय्यक पोलीस निरीक्षक स्मिता पाटील, फौजदार दत्तात्रय लेंडवे हवालदार सलमान खान, अंमलदार गणेश डेरे,तुषार चव्हाण,अंकुश माने, विशाल चौधर,गजानन वानोळे यांनी ही कामगिरी केली.



इंदापूर पोलीसांनी जप्त केलेला गांजा व पकडलेले आरोपी.

## गोमांसप्रकरणी जुन्नरमध्ये गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** एका महागड्या चारचाकी मधून सुमारे सहाशे किलो गोमांस संगमनेरहुन पुणे येथे विक्री करिता घेऊन जात असताना नारायणगाव येथे ही चारचाकी गोरक्षक व पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला असता, ती न थांबता वेगाने जुन्नर बाजूकडे ती गेली. जुन्नर पोलीस पथकाने पाठलाग करीत जुन्नरमध्ये ही चारचाकी अडवली. मात्र, तिच्यातील तीन जण पळून जाण्यात यशस्वी झाले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहमदं रजा शेख व इतर दोन जण (सर्व राहणार जुन्नर) यांच्या विरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोरक्षक शिवराज संगनाळे यांनी फिर्याद नोंद केली आहे. संगमनेरहुन पुणे येथे एका चारचाकी मधून गोमांस घेऊन जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर जुन्नर पोलिसांनी नारायणगाव बायपास येथे ती अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला न जुमानता ही चारचाकी वेगाने जुन्नर बाजू कडे गेली. पोलीस उपनिरीक्षक रगुनाथ शिंदे, अंमलदार दिपक वणवे , कैलास केंद्रे यांनी या गाडीचा पाठलाग करीत जुन्नर वेशीपाशी ही चारचाकी अडवली, परंतु अंधाराचा फायदा घेत गाडीतील तीन जण त्यांच्या सोबतच्या दुसऱ्या वाहनात बसून पळून गेले.

या चारचाकी मध्ये सहाशे किलो गोमांस मिळून आले आहे. याबाबत तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या फरारी तरुणांचा शोध सुरु आहे. सहायक फौजदार भगवान गिजरे पुढील तपास करीत आहेत.




### सोमेश्वर कारखान्याकडून वाघळवाडी ग्रामपंचायतीला ५० गुंठे जागेचे बक्षीसपत्र

## सोमेश्वरनगर-वाघळवाडीकरांना आरोग्य केंद्र

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने वाघळवाडी ग्रामपंचायतीस नविन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभारणीसाठी ५० गुंठे जागा विनामोबदला बक्षीसपत्र करून दिली आहे. यामुळे सोमेश्वरनगर - वाघळवाडी करांना स्वतंत्र आरोग्य केंद्र मिळणार असल्याने लवकरच होळ प्राथमिक आरोग्य केंद्रावरील ताण कमी होणार आहे.

बारामती तालुक्यातील होळ आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत ६० हजारपेक्षा अधिक लोकसंख्या आहे. शिवाय केंद्रापासून सोमेश्वरनगर- निंबूत परिसरातील गावांचे अंतर दहा किलोमीटर असल्याने लोकांना सेवा घेता येत नव्हती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून सोमेश्वर कारखान्यानजीक वाघळवाडी गावाच्या हद्दीत आरोग्य केंद्र मंजूर झाले. त्याला साडेचार कोटींचा निधीही देण्यात आला.

सोमेश्वरचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप, प्रमोद काकडे, संभाजी होळकर, डॉ. मनोज खोमणे आदींनी यासाठी प्रयत्न केले होते. यावर सोमेश्वर कारखान्याच्या वार्षिक सभेत जागा देण्यास सभासदांनी मंजुरी दिली होती. त्यानुसार संचालक मंडळाने ५० गुंठे जागा नुकतीच बक्षीसपत्र करून दिली आहे. यामुळे आता इमारत उभारणीचे काम सुरू होणार आहे. वाघळवाडी ग्रामस्थांनी सोमेश्वरचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप, व्हा.चेअरमन बाळासाहेब कामथे, कार्यकारी संचालक राजेंद्र यादव व संचालक मंडळाचा भेटून सत्कार करत आभार व्यक्त केले. याप्रसंगी सरपंच ॲड. हेमंत गायकवाड, उपसरपंच गणेश जाधव, सतीश सकुंडे,अजिंक्य सावंत, जितेंद्र सकुंडे, अनिल शिंदे, तुषार सकुंडे, विशाल हंगिरे उपस्थित होते.



सोमेश्वर कारखान्याच्या संचालक मंडळाचा सत्कार करताना वाघळवाडी ग्रामस्थ.

प्राथमिक आरोग्य केंद्र, पाणीपुरवठा योजना दिल्याबद्दल अजितदादांचे आणि त्यासाठी कारखान्याच्या वतीने जागा उपलब्ध केल्याबद्दल चेअरमन पुरुषोत्तम, संचालक आणि सभासदांचे आभार मानत आहोत.
-ॲड. हेमंत गायकवाड, सरपंच, वाघळवाडी



# ओढ अंतरीची

*आधुनिक सुखसोयींनी संपन्न असणाऱ्या शहरांमध्ये वास करण्याकडे माणसाचा ओढा वाढला आणि काँक्रिटच्या जंगलात राहण्याची सवयच लागली. पण आजही निसर्गाचा शेजार जपणारी अशी टुमदार वस्ती पाहिली की अंतर्मन तिकडे झेपावू लागतं. दृष्टी पडेल तिथपर्यंत दिसणाऱ्या त्या सौंदर्यखुणा टिपण्यासाठी नजर भिरभिरु लागते. तिथली शांतता मनाच्या गाभाऱ्यात भरुन उरते, आपल्याला श्वासाची लय जाणवू लागते आणि तिथेच स्वत:ची स्वत:शी रम्य भेट होते...!*

# सरकारी कर्मचाऱ्यांना डेस्कवर उभे राहण्याची शिक्षा!

वृद्ध व्यक्ती सरकारी कार्यालयात गेल्यानंतर तिला तास न् तास उभे राहायला लावले, तर संताप येणारच. सामान्यत: सरकारी कार्यालयांमध्ये असे दिसून येते, की कर्मचारी लोकांच्या समस्या उशिरा ऐकतात आणि त्यांना त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी तास न तास वाट पहावी लागते; पण नोएडामधील एका सरकारी विभागाच्या कर्मचाऱ्यांना एका वृद्ध व्यक्तीसोबतचे असे वागणे महागात पडले.

एका आयएएस अधिकाऱ्याला सरकारी कार्यालयात तास न तास उभे राहावे लागल्याची माहिती मिळाली. सीसीटीव्हीद्वारे तक्रारीची पुष्टी झाली तेव्हा अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि सर्व कर्मचाऱ्यांना २० मिनिटे उभे राहण्याची शिक्षा दिली. एका वृद्ध व्यक्तीला बराच वेळ थांबवल्यानंतर सुमारे १६ कर्मचाऱ्यांना त्यांच्या जागेवरून उठून त्यांच्या डेस्कवर २० मिनिटे उभे राहण्यास सांगण्यात आले. ही घटना नोएडाच्या निवासी भूखंड विभागात घडली. तिथे एका वृद्ध व्यक्तीचे ऐकले नाही आणि त्याला बराच वेळ वाट पाहण्यास लावल्याबद्दल कर्मचाऱ्यांना शिशा सुनावण्यात आली.

आयएएस अधिकारी डॉ. लोकेश यांच्या लक्षात आले, की कर्मचारी एका वृद्धाला तास न तास थांबून ठेवत आहेत. त्यांनी या कर्मचाऱ्यांना २० मिनिटे उभे करून वृद्ध व्यक्तीला कसे थांबवले आहे, याची जाणीव करून दिली. लोकेश यांनी सांगितले, की सीसीटीव्हीमध्ये त्यांना दिसले, की कर्मचाऱ्यांनी त्या व्यक्तीच्या मालमत्तेशी संबंधित प्रश्न सोडवला नाही आणि त्याला सुमारे एक तास उभे ठेवले. विभागाच्या कार्यालयात आल्यावर वृद्ध व्यक्तीची समस्या लगेच ऐकली जात नाही, हे पाहून लोकेश यांनी या सर्वांना शाळेत मुलांना उभे राहण्याची शिक्षा दिली जाते, तशीच शिक्षा करण्याचे आदेश दिले. त्यांचे आता कौतुक होत आहे.





# मोरांच्या प्रेमापोटी...

ओरिसातल्या कटकजवळ एका डोंगराच्या पायथ्याशी वसलेलं सिद्धेश्वर फायरिंग रेंज पिकॉक व्हॅली म्हणून ओळखलं जातं. १९९९ मध्ये ओरिसात मोठं वादळ आलं होतं. त्यावेळी तीन मोर जखमी अवस्थेत या परिसरात आले. पन्नू बेहरा नामक व्यक्तीने या मोरांची खूप सेवा केली. त्यानंतर या परिसरात मोरांचा वावर वाढला. त्यांची संख्या ६० पर्यंत पोहोचली. आज या भागात १२० च्या आसपास मोर आहेत. पन्नू बेहरा आज या जगात नाहीत. मात्र त्यांचा नातू कान्हू बेहरा आता ही जबाबदारी सांभाळत आहे. मोरांप्रती असलेल्या प्रेमापोटी कान्हूने चांगल्या कंपनीतली नोकरी नाकारली. मात्र सरकारने त्यांना नोकरी दिली. कान्हूचा आवाज ऐकताच मोर या भागात येतात. पन्नू या भागात होमगार्डचं काम करायचे. त्याच्या मृत्यूनंतर साधारण दहा दिवस मोर फिरकलेच नाहीत. पन्नू यांना आजारपणातही मोरांची काळजी सतावायची. त्यांनी ही जबाबदागी नातू कान्हूवर सोपवली. मोरांच्या अन्नपाण्याचा दिवसाचा खर्च ५०० रुपये आहे. सकाळी ६ ते ८ आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत तो मोरांना दाणापाणी देतो. कान्हूला मार्च महिन्यात होमगार्डची जबाबदारी देण्यात आली. पदवीधर कान्हूला एक कंपनीकडून १८ हजार रुपये पगाराच्या नोकरीचा प्रस्ताव आला होता. मात्र मोरांच्या सेवेसाठी त्याने ही नोकरी नाकारली. कान्हूचं करावं तेवढं कौतुक कमी आहे.

# काय सांगतोय हॉर्न?


धुरांच्या रेषा हवेत सोडणाऱ्या झुकझुक गाडीशी आपली लहानपणीच ओळख होते. गाडीने हॉर्न दिला की आपण चढतो. मात्र प्रत्येक कारणासाठी वेगवेगळ्या पद्धतीने हॉर्न वाजवले जातात. मोटरमन आणि गार्डला एकमेकांशी ताळमेळ बसवता यावा यासाठी प्रत्येक हॉर्न वेगळा असतो. यातला फरक आपल्याला कळत नाही. पण गार्डला हॉर्नचा अर्थ बरोबर कळतो. मोटरमनने एकदाच छोटा हॉर्न दिला तर गाडी यार्डमध्ये जाण्यासाठी तयार असल्याचं समजलं जातं. दोन वेळा छोटा हॉर्न वाजवून चालक गार्डकडे गाडी सुरू करण्याची परवानगी मागत असतो. ट्रेन सुरू असताना तीन वेळा छोटा हॉर्न वाजवला तर चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटलं आहे असं समजावं. यानंतर गार्ड आपल्या डब्यातल्या व्हॅक्युम ब्रेकचा वापर करतो. अचानक गाडी थांबल्यानंतर चालकाने चार वेळा हॉर्न दिला तर गाडीचं इंजिन खराब आहे किंवा गाडी पुढे नेता येणार नाही असं समजलं जातं. चालकाने एकदा मोठा आणि त्यानंतर छोटा हॉर्न दिला तर गार्डने गाडी सुरू होण्याआधी पुन्हा एकदा ब्रेक पाईप सिस्टिमची तपासणी करायची असते. सतत बराच काळ हॉर्न वाजवला जात असेल तर गाडी कोणत्याही स्थानकावर न थांबता पुढे जाणार असल्याचं समजलं जातं. चालकाने सहा वेळा छोटा हॉर्न वाजवला तर तो पुढे दिसत असलेल्या धोक्याचा संकेत असतो.






# भीतीदायक ठिकाणं

या जगात भन्नाट ठिकाणांची कमतरता नाही. काही ठिकाणी आपण जाऊ शकत नाही इतकी ती भयानक असतात. ब्राझीलमध्ये साओ पालो बेटाला स्नेक आयलंड म्हणूनही ओळखलं जातं. इथे असंख्य साप आढळतात. या बेटावर एवढे साप कधी आणि कसे आले हे कोणालाच माहीत नाही. इथे प्रत्येक चौरस मीटर परिसरात पाच साप आढळतात. सापांच्या प्रचंड संख्येमुळे या बेटावर यायला लोक खूप घाबरतात. इथले साप खूप विषारी असतात. जपानमधल्या ओकिघारामध्ये सुसाइड फॉरेस्ट नावाचं एक ठिकाण आहे. २००२ मध्ये या ठिकाणी ७८ लोकांनी आत्महत्या केली होती. हे जंगल माउंट फुजीच्या पायथ्याशी वसलं आहे. इथे अनेक लोक आत्महत्या करतात. आत्महत्या केलेल्या लोकांचे मृतदेह नेण्यासाठी स्थानिक पोलिसांना विशेष अभियान राबवावं लागतं.




# लेहंगा घालून नववधू स्पोर्टस् बाईकवर!

लेहंगा घातलेली नववधू स्पोर्टस् बाईक भरधाव वेगात चालवत असल्याचे पाहून आश्चर्याचा धक्का बसेल ना? परंतु, खरोखरच नववधू लेहेंगा परिधान करून भरधाव वेगात दुचाकी चालवताना दिसली. नवरीची ही स्टाईल पाहून अनेक जण आश्चर्याने पाहतच राहिले. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये वधूच्या जवळून जाणाऱ्या वाहनांमधून प्रवास करणारे लोक कॅमेरे काढून व्हिडीओ बनवत आहेत. जणू त्यांनी जगातील आठवे आश्चर्य पाहिले आहे. व्हिडीओमध्ये वाजत असलेले 'फिर भी ना मिला सजना' हे गाणे वधूच्या लूकला आणि शैलीला खूप शोभते. दबंग वधूच्या या स्टाईलने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे आणि आता लोक इंटरनेटवर याबद्दल चर्चा करत आहेत. नववधू आपला वर राजा म्हणजेच साजनला शोधण्यासाठी निघाली आहे. लाल लेहेंगा आणि रोअरिंग स्पोर्टस्? बाईक वधूच्या सौंदर्यात आणि वर्चस्वात भर घालताना दिसतात. नववधूने लेहेंगा घालून बाइक चालवण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने आपल्या वराला बुलेटवर बसवून फिरवले होते. हा व्हिडीओ आतापर्यंत ८३ लाखांहून अधिक वेळा पाहिला गेला आहे आणि व्हिडीओला दोन लाख ९६ हजारांहून अधिक वेळा लाईकदेखील करण्यात आले आहे. एका यूजरने लिहिले, 'दबंग वधूला पाहून मला गरीब वराची दया येते!'



# हात दाखवून भरता येते बील!

भारतातील बहुतेक दुकाने आणि मॉल्समध्ये ऑनलाइन पेमेंट पर्याय उपलब्ध आहेत. गेल्या काही वर्षांत भारतातील प्रत्येक गावात ऑनलाइन पेमेंट आणि कॅशलेस तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आहे; पण आजही भारत या बाबतीत आपला शेजारी देश चीनपेक्षा ५० वर्षे मागे आहे. चीनमध्ये क्यूआर पेमेंट आता भूतकाळातील गोष्ट बनली आहे, तर चीनी लोकांनी फार पूर्वीच त्यांच्या खिशात कार्ड आणि रोख ठेवणे बंद केले आहे. बहुतेक दुकानांमध्ये क्यूआर कोडही नसतात. चीनमध्ये फक्त हात दाखवून बँकेतून पैसे कापले जातात. चीनमध्ये केवळ हात दाखवून पैसे दिले जात आहेत. अलीकडेच, 'सोशल मीडिया'वर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यात एक व्यक्ती चायनीजच्या दुकानात ताडीने पेमेंट करत आहे, म्हणजे फक्त हात दाखवून पैसे देत आहे. चीनमधील कोणत्याही दुकानातून खरेदी करता, तेव्हा तेथे बसवलेले स्कॅनर मशीन हात स्कॅन करते, त्यानंतर सर्व बँक तपशील दुकानदाराकडे नोंदणीकृत होतात, त्यानंतर त्या दुकानातून फक्त हात दाखवून वस्तू खरेदी करू शकता. स्कॅनरसमोर हात ठेवताच ती रक्कम आपोआप तुमच्या खात्यातून कापली जाईल आणि दुकानदाराच्या खात्यात हस्तांतरित केली जाईल. अशा प्रकारे यंत्रणा कार्य करते व्हिडीओमध्ये असे सांगण्यात आले आहे की, पेमेंट करण्यासाठी तुम्हाला स्टोअरमध्ये जाऊन फक्त तुमचा हात दाखवावा लागेल. त्यानंतर हात स्कॅन करून स्टोअरमध्ये नोंदणीकृत होईल, त्यानंतर तुम्ही त्या स्टोअरच्या कोणत्याही शाखेत फक्त दाखवून पेमेंट करू शकता. तुझा हात करू शकतो. 'सोशल मीडिया'वर व्हायरल पेमेंट बनवण्याचे हे तंत्र खूप मथळे मिळवत आहे. चीनची ही प्रगती पाहून इंटरनेट वापरकर्तेही आश्चर्यचकित झाले आहेत. हा व्हिडीओ शेअर झाल्यापासून लाखो लोकांनी तो पाहिला असून ५ लाख ७८ हजारांहून अधिक वेळा या व्हिडीओला लाईक करण्यात आले आहे.





# लग्नाचा फोटो फाडून घटस्फोटाची पार्टी

एखाद्या तरुणीचे लग्न होते, तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील आनंद निराळाच असतो. गालावर लाजेची लाली पाहायला मिळते, आपल्या आयुष्याची नवी सुरुवात म्हणून ती खूप उत्साही असते. मुलींच्या चेहऱ्यावरील लग्न झाल्याचा आनंद सगळ्यांनीच पाहिलेला असतो; परंतु घटस्फोटाचा आनंद साजरा करण्याची काही उदाहरणे अलीकडे अनुभवायला मिळत आहेत.

'सोशल मीडिया'वर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यात एक महिला घटस्फोटाचा आनंद साजरा करताना दिसत आहे. घटस्फोटानंतर महिला केक कापताना आणि तिच्या लग्नाचा फोटो फाडताना दिसत आहे. घटस्फोटाचा आनंद साजरा करणाऱ्या महिलेने केक कापला. केकवर 'हॅपी घटस्फोट' लिहिले आहे. पतीपासून विभक्त झाल्यानंतर स्त्रीच्या चेहऱ्यावर लग्नाच्या वेळी दिसणारा आनंद कधीच हिरावून बसतो; मात्र या महिलेने अगदी विरुद्ध काम केले. घटस्फोटाचा आनंद तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

महिलेने आधी 'हॅप्पी डिव्होर्स' केक कापला. नंतर कात्रीने लग्नाचा ड्रेस कापला आणि नंतर लग्नाचा फोटो फाडला. हे सर्व करताना ती खूप आनंदी दिसत होती. महिलेने कापलेला ड्रेस हा तिचा लग्नाचा पोशाख आहे. २०२० मध्ये महिलेचे लग्न झाले. त्यांचे नाते चांगले नव्हते आणि २०२४ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. अवघ्या चार वर्षातच दोघेही वेगळे झाले. पार्टीच्या सेलिब्रेशनमध्ये महिलेचा आनंद पाहून नेटकऱ्यांनी भरभरून कमेंट्स दिल्या आहेत.




# आंब्याच्या पानांपासून मद्य

ग्वाल्हेरच्या जीवाजी विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनी आंब्याच्या पानांपासून मद्य तयार केलं आहे. यात आठ ते बारा टक्क्यांपर्यंत अल्कोहोल असेल. अर्थात हे मद्य आरोग्यासाठी लाभदायी ठरणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या मद्यामुळे मधुमेहावर नियंत्रण मिळवता येईल, असा दावा केला जात आहे. यासोबतच शरीरातले फॅट्स कमी करून रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठीही हे मद्य उपयुक्त ठरू शकतं. हे मद्य तयार करण्यासाठी ४५ ते ५० दिवसांचा कालावधी लागला. यासाठी ग्लुकोज, कर्बोदकं आणि पेप्टॉन प्रोटिन्सचा वापर करण्यात आला. हे मद्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या कंपनीसोबत करार करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. आंब्याच्या पानांमध्ये मँगो फेरीन नावाचा घटक असतो. आपलं आरोग्य राखण्यात या घटकाचा महत्त्वाचा वाटा असतो. आंब्याची पानं बारा महिने उपलब्ध असल्यामुळे कोणत्याही हंगामात हे मद्य तयार करता येईल. येत्या काळात हे मद्य औषध म्हणून वापरलं गेलं तर आश्चर्य वाटायला नको.



# लिंबांवर हजारो रुपयांची बोली!

लिंबू गुणकारी आहे ही बाब कोणीही अमान्य करणार नाही. उन्हाळ्यात लिंबू महाग होत असले तरी ते विकत घेण्यासाठी कोणी काही हजार रुपये खर्च करणार नाही. मात्र देवळात अर्पण केलेल्या लिंबासाठी एका जोडप्याने २७ हजार रुपये मोजले. लिंबाच्या लिलावातून मंदिर प्रशासनाला ६८ हजार रुपये उत्पन्न मिळालं. तमिळनाडूमधल्या एका मंदिरात देवाला काही लिंबू अर्पण करण्यात आले होते. या मंदिरात पंगुनी उथीराम फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. ११ दिवस हा महोत्सव सुरू असतो. यावेळी देवाला अर्पण केलेल्या नऊ लिंबाचा लिलाव करण्यात आला. पहिल्याच लिंबासाठी एका दांपत्याने २७ हजार रुपयांची बोली लावली. त्यांनी हे लिंबू खरेदीही केलं. गेल्या अनेक वर्षांपासून मंदिरात ही परंपरा सुरू आहे. देवळात अर्पण केलेले लिंबू खूपच पवित्र मानले जातात. दैवी महत्त्व लक्षात घेऊन लोक त्यांची खरेदी करतात. हे सगळं ऐकल्यावर लिंबाना एवढी किंमत मिळत असल्याचं बघून आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाही.



## At a Glance

### ३५ दुचाकीस्वारांवर गुन्हा दाखल

**नवी दिल्ली :** दक्षिण-पूर्व दिल्लीतील जामिया नगर भागात मॉडिफाइड सायलेन्सर आणि स्टंट परफॉर्मन्सद्वारे गोंधळ घालणाऱ्या दुचाकीस्वारांवर दिल्ली पोलिसांनी 'ऑपरेशन बुलेट राजा' अंतर्गत ३५ मोटारसायकलस्वारांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपायुक्त (दक्षिण-पूर्व) रवीकुमार सिंह यांनी सांगितले की, ही कारवाई ३१ डिसेंबरच्या संध्याकाळी सुरू झाली.

### फटाक्यांसह नववर्ष साजरे करणाऱ्यांना अटक

**आयझॉल :** फटाक्यांसह नववर्ष साजरे करणाऱ्या १२ जणांना आयझॉलमध्ये अटक करण्यात आली आहे. फटाक्यांचा वापर केल्याप्रकरणी राजधानीतील विविध पोलिस ठाण्यात एकूण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रदूषणमुक्त उत्सव साजरा करण्यासाठी राज्य सरकारने फटाके, आकाशकंदील आणि इतर साहित्यावर बंदी घातली.

### दहशतवादी हल्ल्यात ३ जणांचा मृत्यू

**पेशावर :** पाकिस्तानच्या वायव्य भागात बुधवारी झालेल्या तीन वेगवेगळ्या दहशतवादी घटनांमध्ये एका मुलासह तीन जण ठार तर ११ जण जखमी झाले आहेत. खैबर पख्तुनख्वामधील डेरा इस्माईल खान जिल्ह्यातील दाराबन भागात आज पहाटे एक वाजता अज्ञात दहशतवाद्यांनी पोलिस चौकीवर केलेल्या हल्ल्यात एक पोलिस कॉन्स्टेबल आणि एक मजूर ठार झाला, तर दोन जण जखमी झाले.

# भारत हा बांगलादेशसाठी महत्त्वाचाच

## वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुखांच्या भूमिकेला महत्त्व

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारत आणि बांगलादेश यांच्यात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांनी दोन्ही देशांमधील संबंध महत्त्वाचे असल्याचे म्हटले आहे. भारत हा एक महत्त्वाचा शेजारी देश असून आपल्या देशाला निष्पक्षतेवर आधारित संबंध हवे आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. उभय देशांमधील ताज्या तणावाबाबत झमान म्हणाले की, बांगलादेश अनेक प्रकारे भारतावर अवलंबून आहे आणि तो नवी दिल्लीच्या सामरिक हिताच्या विरोधात जाणारे काहीही करणार नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे.

बांगलादेशच्या अग्रगण्य वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत वकार-उझ-झमान म्हणाले की, बांगलादेशच्या स्थैर्यात भारताचे हित आहे. ते म्हणाले की, दोन्ही पक्षांमध्ये उपजीविकेचे नाते आहे जे निष्पक्षतेवर आधारित असले पाहिजे. शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यानंतरची ही पहिलीच मुलाखत आहे. देशांतर्गत आंदोलनानंतर शेख हसीना गेल्या वर्षी ५ ऑगस्ट रोजी ढाका सोडून भारतात आल्या होत्या.

नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशात काळजीवाहू सरकार स्थापन झाल्यापासून भारत-बांगलादेश संबंध अभूतपूर्व पातळीवर बिघडले आहेत. हिंदू संत चिन्मय कृष्ण दास यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करून भारताने द्विपक्षीय संबंध चिघळवले आहेत, तर भारताने बांगलादेशला हिंदू अल्पसंख्याकांवरील हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली आहे.

झमान म्हणाले, भारत हा एक महत्त्वाचा शेजारी आहे. आपण अनेक प्रकारे भारतावर अवलंबून आहोत आणि भारतालाही आपल्याकडून सुविधा मिळत आहेत. त्यांचे बरेच लोक बांगलादेशात औपचारिक आणि अनौपचारिक पणे काम करत आहेत. इथूनही अनेक जण भारतात उपचारासाठी जातात. त्यांच्याकडून आपण भरपूर वस्तू विकत घेतो. त्यामुळे बांगलादेशच्या स्थैर्यात भारताचा मोठा वाटा आहे. दोन्ही देशांमध्ये व्यवहाराचे संबंध आहेत. तो निष्पक्षतेवर आधारित असावा. भारताच्या सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या ईशान्येकडील राज्यांच्या सुरक्षेसाठी ढाकासोबत भारताच्या सहकार्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना झमान म्हणाले की, बांगलादेश आपल्या शेजाऱ्यासोबत असे काहीही करणार नाही जे त्यांच्या सामरिक हिताच्या विरोधात जाईल. शेख हसीना यांच्या सरकारने ईशान्येकडील राज्यांमध्ये बांगलादेशात लपून बसलेल्या भारतविरोधी बंडखोर गटांवर कारवाई केली होती. ढाक्यातील यापूर्वीच्या सरकारांनी या गटांकडे कानाडोळा केला होता आणि बांगलादेशच्या गुप्तचर यंत्रणेतील घटकांनी बंडखोरांना पाठिंबा दिल्याचे वृत्त आहे.

ईशान्येकडील राज्यांच्या सुरक्षेसाठी भारताच्या सहकार्याबद्दल बोलताना झमान म्हणाले, आमच्या शेजाऱ्याने आमच्या हिताच्या विरोधात असे काहीही करू नये अशी आमची अपेक्षा आहे. जेव्हा आपण त्यांच्या हिताची काळजी घेतो, तेव्हा तेही तितक्याच महत्त्वाने आपल्या हिताची काळजी घेतील. बांगलादेश चटगांव पर्वतीय भागात अशांतता निर्माण होऊ देणार नाही आणि म्यानमार सीमेवरील स्थैर्य बिघडू देणार नाही, असे जमान म्हणाले. ते दक्षिण-पूर्व बांगलादेशातील त्या भागाचा उल्लेख करत होते जिथे १९८० आणि १९९० च्या दशकात अनेक भारतविरोधी बंडखोर गट होते.

### समानतेच्या आधारावर चांगले संबंध

● सीमेपलीकडील नद्यांच्या पाण्याचे वाटप आणि भारतीय सुरक्षा दलांकडून सीमेवर लोकांची हत्या यासह अनेक मुद्द्यांवर भारतालाही बांगलादेशची चिंता दूर करावी लागेल, असे झमान यांनी सूचित केले. ते (भारत) सीमेवर आमच्या लोकांना मारणार नाहीत. आम्हाला आमच्या वाट्याचे पाणी मिळेल. काही प्रॉब्लेम नाही. नातं त्याच पातळीवर राहू द्या. बांगलादेश आणि भारताला समानतेच्या आधारावर चांगले संबंध ठेवावे लागतील आणि बांगलादेशी जनतेने कोणत्याही प्रकारे असे समजू नये की भारत आमच्यावर वर्चस्व गाजवत आहे, जे आमच्या हिताच्या विरोधात आहे.



बांगलादेश अनेक प्रकारे भारतावर अवलंबून आहे आणि तो नवी दिल्लीच्या सामरिक हिताच्या विरोधात जाणारे काहीही करणार नाही.

**— जनरल वकार-उझ-झमान,** लष्करप्रमुख, बांगलादेश

# सर्वोच्च न्यायालयाच्या समितीची बैठक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या प्रस्तावित बैठकीला उपस्थित राहण्यास संयुक्त किसान मोर्चाने असमर्थता दर्शवली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने ३ जानेवारी रोजी पंचकुला येथे होणाऱ्या बैठकीला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे. तथापि, एसकेएम या बैठकीला उपस्थित राहणार नाही, असे समितीने एका निवेदनात म्हटले आहे.

पंजाब आणि हरयाणातील शंभू आणि खनौरी सीमेवर शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ही समिती स्थापन करण्यात आली होती. एसकेएमने मात्र या आंदोलनात सहभागी नसल्याचे स्पष्ट केले आहे. संयुक्त किसान मोर्चा (बिगरराजकीय) आणि किसान मजदूर मोर्चा (केएमएम) यांच्या बॅनरखाली शेतकरी गेल्या वर्षी १३ फेब्रुवारीपासून शंभू आणि खनौरी सीमेवर ठाण मांडून बसले आहेत.

ज्येष्ठ शेतकरी नेते जगजीत सिंग डल्लेवाल हे २६ नोव्हेंबरपासून खनौरी सीमेवर बेमुदत उपोषणाला बसले आहेत. पिकांना किमान आधारभूत किमतीची कायदेशीर हमी मिळावी, या त्यांच्या मागण्या आहेत.

### समितीचा विरोध

● एसकेएमने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने २ सप्टेंबरच्या आपल्या आदेशात शेतकऱ्यांना राजकीय पक्ष आणि राजकीय मुद्द्यांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. शेतकऱ्यांनी उपस्थित केलेले प्रश्न टप्प्याटप्प्याने सोडवले जातील, असेही न्यायालयाने म्हटले होते. एसकेएमने मात्र न्यायालयाचा हस्तक्षेप फेटाळून लावत म्हटले की, शेतकरी धोरणात्मक मुद्द्यांवर केंद्र सरकारशी लढत असून, अशा स्थितीत न्यायालयाची कोणतीही भूमिका नसावी.

# नवा विमान कायदा झाला लागू

## हवाई वाहतूक सुलभ करण्यासाठीचा निर्णय : अधिसूचना जारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** विमानांच्या निर्मिती आणि डिझाइनला प्रोत्साहन देण्यासाठी आणि हवाई वाहतूक क्षेत्रात व्यवसाय सुलभकरण्यासाठी भारत सरकारने लागू केलेला 'इंडियन एअरक्राफ्ट अ‍ॅक्ट २०२४' आजपासून लागू झाला आहे. हा कायदा ९० वर्षे जुन्या विमान कायदा १९३४ ची जागा घेईल. १ जानेवारी २०२५ पासून हा कायदा लागू होणार असल्याची घोषणा सरकारने अधिसूचना काढली. संसदेने गेल्या वर्षी डिसेंबरच्या सुरुवातीला त्याला मंजुरी दिली होती. विमानाचे डिझाइन, उत्पादन, देखभाल, मालकी, वापर, ऑपरेशन, विक्री, निर्यात आणि आयात यांचे नियमन आणि नियंत्रण सुनिश्चित करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. त्याचबरोबर हवाई वाहतूक क्षेत्रात सुधारणा आणि पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आहे.

हा कायदा भारतीय कंपन्यांना विमान निर्मिती आणि डिझाइनमध्ये सक्षम करेल. यामुळे जुन्या कायद्यात २१ वेळा असलेली गुंतागुंत दूर होणार आहे. यामुळे भारताच्या वेगाने वाढणाऱ्या नागरी हवाई वाहतूक बाजारपेठेला नव्या उंचीवर नेण्यास मदत होईल.

या कायद्यामुळे विमानांची निर्मिती, डिझाइन, देखभाल, मालकी, वापर, ऑपरेशन, विक्री, निर्यात आणि आयात यावर संपूर्ण नियंत्रण केंद्र सरकारला मिळते. विमानांशी संबंधित इतर बाबींचे नियमन आणि नियंत्रण करण्याचे अधिकार केंद्र सरकारला असतील. या कायद्यानुसार विमानांचे धोकादायक उड्डाण, विमानात शस्त्रे किंवा स्फोटके बाळगणे, विमानतळाजवळ कचरा टाकणे किंवा जनावरांची कत्तल करणे गुन्हा आहे. या गुन्ह्यांमध्ये तीन वर्षांपर्यंत कारावास, एक कोटी रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

या कायद्यामुळे भारत हवाई वाहतूक उद्योगात स्वयंपूर्ण तर होईलच, शिवाय जागतिक स्पर्धात्मकतेतही भक्कम स्थान मिळेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. इंडियन एरोनॉटिक्स अ‍ॅक्ट, २०२४ ची अंमलबजावणी हे भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रातील सुधारणा आणि नावीन्यपूर्णतेचे लक्षण आहे.

### माझे सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध

**सातारा :** कराड उत्तरमधील मतदारांनी मला २५ वर्षे विधिमंडळात प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. या काळात काँग्रेस, एकनाथ शिंदे असतील किंवा अजित पवार असतील, या सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेऊन काम करण्याची माझी भूमिका राहिली आहे, असं वक्तव्य माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केलं. या वक्तव्यातून त्यांनी आपल्या विरोधकांना सूचक इशारा दिला आहे. परंतु, शरद पवार गट अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाणार का, या चर्चेला सुद्धा अधिकच जोर आला आहे.

राज्यातील सर्वच पक्षांशी, नेत्यांशी व्यक्तिशः माझे चांगल्या प्रकारचे संबंध आहेत, असं माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी सांगितलं. "यशवंतरावांचा विचार सोडायचा नाही, ही आपली भूमिका आहे.

# शिर्डीत लाखो साईभक्तांची हजेरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**शिर्डी :** संपूर्ण देशभरासह साईंच्या शिर्डीतही मोठ्या उत्साहात नवीन वर्षाचं स्वागत करण्यात आलं. सरत्या २०२४ वर्षाला निरोप देताना २०२५ या नववर्षांच स्वागत मंगलमय वातावरणात करण्यासाठी लाखो साईभक्तांनी साई दरबारात हजेरी लावली. नवीन वर्षा निमित्तानं बंगळुरू येथील एका भाविकाच्या देणगीतून साई मंदिरासह परिसराला विविध रंगांचा फुलांची सजावट करण्यात आलीय.

सर्व भाविकांना साईंचे दर्शन मिळावे, यासाठी साईबाबा संस्थानच्या वतीनं ३१ डिसेंबर रोजी रात्रभर साई मंदिर दर्शनासाठी खुलं ठेवण्यात आलं होतं. साई मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुल ठेवल्यानं लाखो भाविकांना रात्रीतून दर्शन घेता आलं. नवीन वर्ष साईंच्या दर्शनानं सुरू करण्यासाठी साई मंदिराच्या दर्शनबारीसह मंदिर परिसरात भाविकांची मांदियाळी साईदर्शनासाठी दिसून आली. अनेक भक्तांनी सरत्या वर्षात तर अनेकांनी नवीन वर्षाची सुरुवात साई दर्शनानं केल्याचं दिसून आलं.

साई भजने म्हणत नवीन वर्षाची सुरुवात- मंदिरात प्रवेश करता आला नाही, अशा साईभक्तांनी साई समाधी मंदिराच्या कळसाचं तसेच एल सीडी स्क्रिनवर साईंचं दर्शन घेत धन्यता मानली. रात्री बाराच्या दरम्यान साईमंदिरात मोठ्या प्रमाणात भाविकांनी उपस्थित राहत साईनामाच्या गजरात नव वर्षाचं स्वागत केलंय. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे सहपत्नीक उपस्थित होते. साईनगरीत नवीन वर्षाचं स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात आल. तासनतास रांगेत उभं राहात भाविकांनी नवीन वर्षाचा संकल्प साईबाबांना साक्षी ठेवत केलाय. रात्री १२ वाजता भाविकांनी मोठ्या प्रमाणात द्वारकामाई मंदिरा समोरही गर्दी केली होती. या वेळी साई भजने म्हणत बरोबर बाराचा ठोका होताच साईंचा जयघोष करत भाविकांनी नवीन वर्षाची सुरुवात शिर्डीत केली आहे.

# पदभार स्वीकारा, फडणवीस यांचे आदेश



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नागपुरात १६ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान हिवाळी अधिवेशन पार पडलं. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळ विस्तार आणि शपथविधीचा सोहळा पार पडला. त्याआधी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीपदावरून महायुतीत नाव निश्चित होत नसल्यामुळं शपथविधी लांबणीवर गेला. तसेच महायुतीत कोणाला कोणती खाती द्यायची? आणि कोणाला मंत्री करायचे? यावरूनही एकमत होत नसल्यामुळं मंत्रिमंडळ विस्तार आणि शपथविधी लांबणीवर गेल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, आता मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप, मंत्र्यांना बंगले आणि फ्लॅट देण्यात आले आहेत. परंतु हे सर्व होऊनही अद्यापपर्यंत महायुतीतील अनेक मंत्र्यांनी आपल्या मंत्रिपदाचा पदभार स्वीकारलेला नाही. त्यामुळं पदभार न स्वीकारलेल्या मंत्र्यांनी आज किंवा उद्या पदभार स्वीकारा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर नागपुरात पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यावेळी त्यांनी आपण शंभर दिवसाचा विकास आराखडा तयार करण्याचं म्हटलं होतं. यानंतर मुख्यमंत्री जोरात कामाला लागले असताना मंत्री मात्र सत्कार समारंभ आणि हारतुरे यात व्यग्र आहेत. तर काही मंत्री परदेश दौऱ्यावर विश्रांती घेत आहेत.

मागील आठवड्यात माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचं निधन झालं. एक आठवड्याचा दुखवटा पाळण्यात आला. यामुळे काही मंत्र्यांना पदभार स्वीकारलेला नव्हता. परंतु आता मंत्रिपदाचा पदभार न स्वीकारलेल्या मंत्र्यांनी एक किंवा दोन जानेवारीला पदभार स्वीकारावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांना दिले आहेत. मुख्यमंत्र्यांना १०० दिवसाचा रोड मॅप तयार करायचा आहे. झालेल्या विकासकामांचा १०० दिवसाचा कृती आराखडा बनवायचा आहे.

या १०० दिवसात प्रत्येक खात्याचा संबंधित मंत्र्याकडून १०० दिवसाचा आढावा मुख्यमंत्री घेणार आहेत. म्हणून या कृती आराखड्यासाठी आपण लवकरच कामाला लागले पाहिजे. यामुळं मंत्रिपदाचा पदभार न स्वीकारलेल्या मंत्र्यांनी लवकरच पदभार स्वीकारून कामाला लागावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## नवीन वर्षाचे स्वागत...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**दुबई** दुबई येथे नवीन वर्षाच्या स्वागतासाठी बुर्ज खलिफा या जगातील सर्वात उंच इमारतीवर फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली.

# मस्साजोग ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडच्या अटकेनंतर मस्साजोग ग्रामस्थांनी तीन फरार असलेल्या आरोपींच्या अटकेची मागणी लावून धरली आहे. सरपंच संतोष देशमुख प्रकरणाशी संबंध असलेले तीन आरोपींना अटक करा, अशी मागणी करत मस्साजोग ग्रामस्थांनी आज जलसमाधी आंदोलन केले.

पवन ऊर्जा प्रकल्पाच्या खंडणी प्रकरणाच्या गुन्ह्यातील आत्मसमर्पण केलेला वाल्मिक कराड याला केज न्यायालयानं १५ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची सुदर्शन घुले आणि त्यांच्या साथीदारांनी दिनांक ९ डिसेंबर रोजी अपहरण करून अत्यंत निर्घृणपणे हत्या केली.

या प्रकरणाशी वाल्मिक कराडचा थेट संबंध असल्याचा विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आरोप केला. २९ नोव्हेंबर रोजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराडनं पवनउर्जा कंपनीच्या अधिकाऱ्याकडं खंडणी मागितली होती.

या प्रकरणी कंपनीचे अधिकारी सुनील शिंदे यांनी ११ डिसेंबरला पोलिसात तक्रार दिली होती. या प्रकरणी पोलिसांनी वाल्मिक कराड आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यासह तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

# पाकच्या ताब्यात ४९ नागरीकैदी, २१७ भारतीय मच्छिमार


### विषय

**भारत आणि पाकिस्तान ने मिळून सोमवारी राजनैतिक माध्यमातून नागरी कैदी आणि मच्छीमारांच्या याद्यांची देवाणघेवाण केली. ही देवाणघेवाण २००८ च्या द्विपक्षीय कॉन्सुलर अ‍ॅक्सेस करारानुसार करण्यात आली होती, त्यानुसार दरवर्षी १ जानेवारी आणि १ जुलै रोजी अशा याद्या सामायिक केल्या जातात.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताने आपल्या ताब्यातील ३८९ नागरी कैदी आणि ८१ मच्छिमारांची यादी पाकिस्तानला दिली आहे, जे एकतर पाकिस्तानी आहेत किंवा पाकिस्तानी असल्याचे मानले जाते. त्याचप्रमाणे पाकिस्तानने आपल्या ताब्यातील ४९ भारतीय नागरी कैदी आणि २१७ भारतीय मच्छिमारांची यादी जाहीर केली आहे, जे एकतर भारतीय आहेत किंवा भारतीय असल्याचे मानले जाते.

भारतीय नागरी कैदी, मच्छीमार आणि त्यांच्या बोटी तसेच पाकिस्तानच्या ताब्यातील



बेपत्ता भारतीय संरक्षण कर्मचार् यांची लवकरात लवकर सुटका करून त्यांना मायदेशी परत पाठवण्याचे आवाहनही भारत सरकारने पाकिस्तानला केले आहे. विशेष म्हणजे शिक्षा पूर्ण झालेल्या १८३ भारतीय मच्छीमार आणि नागरी कैद्यांची सुटका करण्याची मागणी पाकिस्तानकडे करण्यात आली आहे. तसेच ज्या १८ भारतीय आणि नागरी कैद्यांना आणि मच्छीमारांना अद्याप ही सुविधा देण्यात आलेली नाही, त्यांना तातडीने कॉन्सुलर अ‍ॅक्सेस देण्यात यावा, अशी ही मागणी करण्यात आली आहे.

पाकिस्तानने आपल्या ताब्यातील सर्व भारतीय नागरिक आणि मच्छीमारांची सुटका होईपर्यंत त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी विनंतीही भारताने पाकिस्तानला केली आहे. पाकिस्तानने आपल्या ताब्यातील ७६ पाकिस्तानी विश्वासू नागरी कैदी आणि मच्छिमारांची नागरिकत्व पडताळणी प्रक्रिया जलद गतीने करावी, अशी विनंती भारताने पाकिस्तानला केली आहे. हे लोक भारताच्या ताब्यात आहेत आणि पाकिस्तानने त्यांच्या नागरिकत्वाची पुष्टी न केल्यानेच त्यांचे परतयेणे प्रलंबित आहे.

### २,६३९ भारतीय मच्छिमारांची सुटका

● सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे २०१४ पासून आतापर्यंत २,६३९ भारतीय मच्छीमार आणि ७१ भारतीय नागरी कैद्यांची पाकिस्तानच्या ताब्यातून सुटका करण्यात आली आहे. त्यापैकी ४७८ भारतीय मच्छीमार आणि १३ भारतीय नागरी कैद्यांची २०२३ पासून सुटका करण्यात आली आहे.



“ सॅम जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला मान देत नाही. त्याच्या चेंडूवर बरेच शॉट्स खेळले जात होते. यामुळे विराट निराश झाला होता. सॅमशी त्याचे वागणे यामुळे असेल. त्याने जे काही केले ते संघासाठी केले. विराट हा वाईट माणूस नाही. — मायकेल क्लार्क

“ त्याने खेळाडूंना त्यांच्या पद्धतीने खेळण्यासाठी ६ महिन्यांचा वेळ दिला होता, पण आता ते सर्व संपले आहे. यापुढे जो खेळाडू संघासाठी माझ्या योजनेनुसार खेळणार नाही, त्याला धन्यवाद म्हटले जाईल. — गौतम गंभीर



# कॅप्टन्सीसाठी वाढतेय महत्वाकांक्षा?

## मला कर्णधार व्हायचंय! टीम इंडियाच्या ड्रेसिंगमध्ये टेन्शन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मेलबर्न :** भारतीय क्रिकेट संघ सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका खेळत आहे. मात्र या मालिकेत पहिल्या सामन्यात विजय मिळवल्यानंतर मात्र भारतीय संघाची कामगिरी खालावली. ब्रिस्बेन आणि मेलबर्न कसोटीत भारतीय संघ फॉलोऑनच्या उंबरठ्यावरही होता. या मालिकेत आता भारतीय संघ चार सामन्यांनंतर १-२ अशा फरकाने पिछाडीवर आहे. मेलबर्नला झालेली चौथी कसोटी वाचवण्याची संधी भारतीय संघाकडे होती, परंतु, भारताने सामन्याच्या अखेरच्या सत्रात सात विकेट्स गमावल्या. त्यामुळे हा सामनाही गमावला.

दरम्यान, इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार या सामन्यानंतर भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर ड्रेसिंग रुममध्ये भडकला होता. त्याने खेळाडूंना कडक शब्दात सुनावले असल्याचे समजत आहे. याशिवाय त्याने खेळाडूंना वॉर्निंग दिली आहे की गरज पडली, तर तो खेळाडूंना संघाबाहेरचा रस्ताही दाखवू शकतो. त्याने खेळाडूंना स्वतःच्या मर्जीपेक्षा ठरवलेल्या योजना अंमलात आणण्याची तंबी दिली आहे. ड्रेसिंग रुममधील त्याचे हे संभाषण लीक झाले आहे.

याशिवाय रिपोर्टमध्ये पुढे म्हटले आहे की असंही समजत आहे की भारताच्या ड्रेसिंग रुममधील वातावरण फारसे चांगले नाही. सध्या भारताच्या ड्रेसिंग रुममध्ये तणाव आहे. हा तणाव ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या सामन्याच्या आधीपासून आहेत. सध्या भारतीय संघ संक्रमणाच्या काळातून जात आहे. त्यामुळे कर्णधारपदाची महत्त्वकांक्षाही संघात दिसून येत आहे. सध्याचा कर्णधार रोहित शर्मा ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी पालकत्व रजेमुळे उशीराने दाखल झाला होता. त्याने पहिला सामनाही खेळला नव्हता. त्याच्या जागेवर जसप्रीत बुमराहने नेतृत्व केले होते.

दरम्यान, रोहित संघात येईपर्यंत काही खेळाडूंमध्ये कर्णधापदासाठीच्या महत्त्वकांक्षा दिसून आल्या होत्या. त्यांनी उघडपणे बोलून दाखवले होते की या दौऱ्यात भारतीय संघासाठी काही विशेष करणे त्यांच्यावर अवलंबून आहे. तसेच एक वरिष्ठ खेळाडू आपण कसं महत्त्वाचे आहोत, हेच चित्र निर्माण करण्यात भाग घेत आहे. तो हेच दाखवत आहे की अद्याप युवा खेळाडू नेतृत्वाची जबाबदारी घेण्यास तयार नाहीत आणि स्वतःला एक पर्याय म्हणून पुढे करत आहे.

### स्टार खेळाडूंची 'हाराकिरी'

● मेलबर्न कसोटीत ऋषभ पंत बेदरकारपणे फटका मारत बाद झाला. पंतचे बाद होणे हा सामन्यातील टर्निंग पॉइंट ठरला. तर विराट कोहलीने या मालिकेत आठव्यांदा स्लिपमध्ये झेल दिला. मेलबर्न कसोटीतील दुसऱ्या डावात सावध सुरुवात केल्यानंतर कर्णधार रोहित शर्माने आपल्याच चुकीची पुनरावृत्ती केली. आपल्या खेळीला मोठ्या धावसंख्येमध्ये रूपांतर करण्यात तो अपयशी ठरला. दिग्गज खेळाडूंच्या हाराकिरीची गौतम गंभीर यांनी दखल घेतली आहे. गौतम गंभीर यांनी सुमारे सहा महिन्यांपूर्वी टीम इंडियाचे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारली. तेव्हापासून त्यांनी खेळाडूंना पूर्ण स्वातंत्र्य दिले. मात्र ऑस्ट्रेलिया दौऱ्यात दिग्गज खेळाडूंनी नांगी टाकली.

## टेस्ट बॉलिंग रँकिंग- बुमराहने ९०७ रेटिंग पॉइंट्स मिळवले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत ९०७ रेटिंग गुण मिळवणारा पहिला भारतीय ठरला आहे. त्याने गेल्या आठवड्यात ९०४ रेटिंगसह रविचंद्रन अश्विनच्या विक्रमाशी बरोबरी केली होती. अश्विनला डिसेंबर २०१६ मध्ये इतके रेटिंग गुण मिळाले होते. दुसरीकडे, यशस्वी जैस्वालने आयसीसी पुरुषांच्या कसोटी फलंदाजी क्रमवारीत एक स्थान उंचावले आहे आणि कारकिर्दीतील सर्वोत्तम रँकिंग गाठले आहे.

बुमराह आतापर्यंत या मालिकेत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या सुरुवातीच्या चार सामन्यांत त्याने 30 विकेट्स घेतल्या आहेत. त्याची सरासरीही १२.८३ इतकी आहे. कसोटी क्रमवारीत तो अव्वल स्थानावर कायम आहे. त्याच्यानंतर पॅट कमिन्स दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने २० विकेट घेतल्या आहेत. जोश हेझलवूड (८४३) सध्या दुसऱ्या स्थानावर आणि पॅट कमिन्स (८३७) तिसऱ्या स्थानावर आहे.

## आठव्या फेरीअखेर चार खेळाडू संयुक्तरित्या आघाडीवर



**पुणे :** ३७व्या ९ वर्षाखालील खुल्या व मुलींच्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत आठव्या फेरीअखेर खुल्या गटात आरित कपिलने ७.५ गुणांसह, तर मुलींच्या गटात राध्या मल्होत्रा, दिवी बिजेश, कियान्ना परिहार यांनी ७ गुणांसह संयुक्तरित्या आघाडी प्राप्त केली आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॉक्सिंग हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात आठव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत दिल्लीच्या आरित कपिलने तेलंगणाच्या निधिश श्यामलचा पराभव करून ७.५ गुणांसह आघाडी मिळवली. दुसऱ्या पटावरील कर्नाटकच्या अयान फुटाणेने तामिळनाडूच्या लिशांत बीला बरोबरीत रोखले व ७ गुण प्राप्त केले. मुलींच्या गटात पंजाबच्या राध्या मल्होत्राने महाराष्ट्राच्या कार्तिक उताराला बरोबरीत रोखले व ७ गुण प्राप्त केले. केरळच्या दिवी बिजेशने तामिळनाडूच्या मार्कसिम कार्की श्रीयुक्ताचा पराभव करून ७ गुणांची कमाई केली.

## महाराष्ट्राचा सलग पाचवा विजय; सिक्कीमवर आठ विकेटने मात



**नवी दिल्ली :** विजय हजारे राष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत ब गटातले आपले वर्चस्व कायम ठेवणाऱ्या महाराष्ट्राने सलग पाचवा विजय मिळवत बाद फेरी जवळपास निश्चित केली आहे. आज सामन्यात त्यांनी सिक्कीमचा आठ विकेट आणि ९६ चेंडू राखून एकतर्फी विजय मिळवला. वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करणाऱ्या सिक्कीमला ५० षटकांत ८ बाद २३४ असे रोखले आणि त्यानंतर विजयाचे हे आव्हान ३४ षटकांत पार केले. या स्पर्धेत फॉर्मात असलेल्या ओम भोसले याने पुन्हा एकदा सातत्य दाखवले, परंतु तो शतकापासून सहा धावा दूर राहिला. १०१ चेंडूत त्याने ९४ धावांची खेळी केली. सिद्धेश वीरनेही आपले सातत्य राखले. त्यानेही ४९ चेंडूत ६४ धावांची खेळी साकार केली. यष्टीरक्षक फलंदाज निखिल नाईकने नाबाद ४६ धावा फटकावल्या. तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना सिक्कीमने ३२ षटकांत ३ बाद १४४ अशी सुरुवात केली होती, परंतु त्यानंतर त्यांना ९० धावाच अधिक करता आल्या.

## ब्रिलीयंट्स स्पोर्टस ॲकॅडमी,
# एसएआरके क्रिकेट ॲकॅडमी संघांची विजयी कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित ‘कोद्रे फार्म्स करंडक’ १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेत पुणे क्रिकेट ॲकॅडमी, ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी आणि एसएआरके क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत विराट भिसे याने केलेल्या नाबाद ७५ धावांच्या खेळीमुळे पुणे क्रिकेट ॲकॅडमीने मॅव्हरीक्स् क्रिकेट ॲकॅडमीचा ७९ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या पुणे क्रिकेट ॲकॅडमीने २२ षटकात २०७ धावांचे आव्हान उभे केले होते. विराट भिसे याने नाबाद ७५ धावांची आणि आदित्य मोहीते याने ६० धावांची खेळी केली. या आव्हानाला उत्तर देताना मॅव्हरीक्स् क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १२८ धावांवर मर्यादित राहीला.

स्वराज मोरे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीने एके क्रिकेट ॲकॅडमीचा ८७ धावांनी सहज पराभव केला. रतम सेन (९२ धावा) आणि स्वराज मोरे (५१ धावा) यांनी केलेल्या धावांच्या जोरावर पहिल्यांदा फलंदाजी करताना ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीने २१६ धावांचे लक्ष्य उभे केले होते.

### लाईफ फिट क्रिकेट अकादमी संघाची विजयी सलामी

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत अद्वैत देशपांडे(२-४)याने केलेल्या सुरेख गोलंदाजीसह यश दराडेच्या उपयुक्त ४१ धावांच्या जोरावर लाईफ फिट क्रिकेट अकादमी संघाने ओएसीस क्रिकेट क्लब संघाचा २८ धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली.

धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी व स्टार क्रिकेट मैदानावर आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत सलामीच्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना लाईफ फिट क्रिकेट अकादमी संघाने २५ षटकात ६ बाद १६८ धावा केल्या. यात यश दराडे ४१, अवनिश ढमाळ ३९, आरिन सातपुते १९ यांनी धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना ओएसीस क्रिकेट क्लब संघ २४.१ षटकात सर्व बाद १४० धावावर संपुष्टात आला. यात शार्दुल गराडे ४२, निमिश शेंदुरकर १६ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली.

## अहिल्यानगरच्या मातीत रंगणार
# ‘महाराष्ट्र केसरी’: २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**अहिल्यानगर :** वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा नगरच्या मातीत रंगणार असून, नवीन वर्षाच्या मुहूर्तावर अहिल्यानगरला आनंदाची बातमी मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघातर्फे वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत स्पर्धा २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान वाडिया पार्क येथे आयोजित केली आहे. शहर व जिल्हा संघांनी शहर व जिल्हा कुस्तीगीर, तालीम संघाच्या निवड चाचणी कुस्ती स्पर्धा घेण्यात याव्यात, निवड चाचणीतून निवडलेला संघाची गादी व माती, अशी वेगवेगळी प्रवेशिका संघाच्या लेटरहेडवरती खेळाडू, मार्गदर्शक व व्यवस्थापकांच्या नावासह २५ जानेवारी पूर्वी मेलवर व किंवा पत्त्यावर पाठवावे, असे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने सांगितले आहे.

कुस्तीगीर ज्या शहर, जिल्हा संघातून सहभागी होणार आहे , तो त्या शहर, जिल्ह्यातील रहिवासी असणे बंधनकारक आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कुस्तीगिरांची जन्म तारीख २००४ व त्या पूर्वीची असावी, तसेच २००५ व २००६ मध्ये जन्मलेल्या कुस्तीगिरास मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमतीपत्र आवश्यक आहे. वयाचा व रहिवासी पुरावा म्हणून ओरिजनल आधार कार्ड, अथवा पासपोर्ट ग्राह्य धरण्यात येईल. रेल्वे व आर्मीमध्ये नोकरीस असलेल्या कुस्तीगिरास या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही, ग्रीकरोमण राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेत्या कुस्तीगिरास स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही.

## राज्य, राष्ट्रीय स्तरावर तन्वीने पटकावली तब्बल ७२ पदके



**सावर्डे :** माझी आई डीएड् पदविकाधारक असूनही नोकरी न करता घरी राहून तिने माझ्या आहाराकडे लक्ष दिले. घरकाम सांभाळून स्पर्धेसाठी ती कायम सोबत राहिली. शाळेच्या अभ्यासात वडिलांनी मार्गदर्शन केले. त्यामुळेच मला जलतरणच्या विविध राज्य व राष्ट्रीय पातळीवर आठ वर्षांत ७२ पदकं मिळवता आली. पुढे वैद्यकीय अभ्यासक्रमाला जाऊन जलतरण स्पर्धेत देशाचे प्रतिनिधीत्व करण्याचे स्वप्न आहे, असे राष्ट्रीय जलतरणपटू तन्वी जाधव हिने सांगितले. तन्वी ही डेरवण येथील एसव्हीजेसीटीच्या इंग्रजी माध्यम शाळेची विद्यार्थिनी. ती सध्या दहावीत शिकत आहे. मुळची गाणे (ता. चिपळूण) येथील रहिवासी. वडील नोकरीनिमित्त कुंभारखाणी बुद्रुक येथे आल्यानंतर मुलांच्या शिक्षणासाठी ते सावर्डेत राहण्यास आले. तिथे त्यांनी त्यांच्या शेजारी लांजा येथील आर्या सिनकर नावाची मुलगी एसव्हीजेसीटीच्या क्रीडा संकुलावर केवळ धावण्याच्या स्पर्धेच्या सरावासाठी आलेली पाहिली.

## महाराष्ट्र राज्यस्तरीय शिवनेरी श्री २०२४ चा मानकरी ठरला मुंबईचा शशांक वाकडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**जुन्नर :** शिवनेरी फिटनेस, जुन्नरच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळी महाराष्ट्र राज्यस्तरीय आयोजित महाराष्ट्र शिवनेरी श्री २०२४ ही स्पर्धा मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडली.

स्पर्धेचे आयोजन महेश शेटे, जितेश शेटे या बंधूंनी व महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या संलग्न संघटनांची मिळून केले होते. अतिशय अतितटीच्या सामन्यात महाराष्ट्र शिवनेरी श्री २०२४ चा मानकरी मुंबईचा शशांक वाकडे ठरला, तर महिला गटातून पुण्याच्या शितल वाडेकर यांनी गोल्ड मेडल जिंकले. या स्पर्धेतील बेस्ट पोजरचा मानकरी विनायक लोखंडे, मोस्ट इम्प्रुव्हड बॉडी बिल्डरचा मानकरी पंचाक्षरी लोणारे आणि अपकमिंग बॉडी बिल्डरचा मानकरी पुण्याचा ओमकार नलावडे ठरला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या या पावनभूमीमध्ये महाराष्ट्रातून ३१२ स्पर्धकांनी हजेरी लावली. महाराष्ट्रातून आलेल्या महिला खेळाडू या स्पर्धेतील प्रमुख आकर्षण ठरल्या. कार्यक्रमास सत्यशिल शेरकर जुन्नर ह्याठिकाणी उपस्थित राहिले. यावेळी या पावन भूमीमध्ये महाराष्ट्रातून आलेल्या सर्व स्पर्धकांचे त्यांनी स्वागत व अभिनंदन केले. व्यसनापासून तरुण पिढीने दूर राहून फिटनेस कडे लक्ष द्यावे, असे सुचवले.

या प्रसंगी महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सेक्रेटरी राजेंद्र चव्हाण, खजिनदार अजय गोळे, उपाध्यक्ष शरद मारणे, गोपाळ गायकवाड, राजेश वडाम, हेमंत खेबडे, मयूर दरंदले, मंदार अगवनकर, कुतुब सय्यद जुन्नर टुरिझम डेस्टिनेशन मॅनेजमेंट चे चेतन पारखे,विलास कडलाक,जितेंद्र देशमुख, विनायक खोत,सतीश नाईक तसेच लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे अध्यक्ष विश्वास भालेकर, सेक्रेटरी जितेंद्र काळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये एका चेंडूवर १५ धावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मीरपूर :** एका चेंडूत १५ धावा... क्रिकेटमध्ये असे क्वचितच घडते, जेव्हा एका चेंडूत १५ धावा होतात. पण, हे वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ डिसेंबरला मंगळवारी घडले. जेव्हा बांगलादेश प्रीमियर लीगच्या तिसऱ्या सामन्यात खुलना टायगर्सचा गोलंदाज ओशान थॉमसने एका चेंडूत १५ धावा खर्च केल्या. हा सामना खुलना टायगर्स आणि चटगाव किंग्ज यांच्यात होता. पहिल्या षटकात वेस्ट इंडिजच्या थॉमसने या षटकात १८ धावा दिल्या. मात्र, खुलना टायगर्सने हा सामना ३७ धावांनी जिंकला.

चटगाव किंग्स संघ २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करत होता. कर्णधार मेहदी हसन मिराजने नवीन चेंडू ओशाने थॉमसकडे सोपवला आणि पहिले षटक टाकण्याची जबाबदारी त्याच्याकडे दिली. थॉमसचा पहिला चेंडू नो होता, पण चॅलेंजर्सचा सलामीवीर मोहम्मद नसीम इस्लामला फ्री-हिटवर एकही धाव करता आली नाही. थॉमसने दुसरा नो बॉलही टाकला, ज्यावर नसीमने षटकार ठोकला. नसीमला फ्री-हिटची संधी मिळाली, पण थॉमसने सलग दोन वाइड चेंडू टाकले. यानंतर नसीमने चौकार मारला, पण अंपायरने पुन्हा नो बॉल म्हटले. थॉमसला दोन चेंडूही पूर्ण करता आले नाहीत आणि चटगाव किंग्जची धावसंख्या १५ पर्यंत पोहोचली.

## एक्सीलेंट जूनियर प्री स्कूल शाळेचा वार्षिक क्रीडा दिन साजरा



**पुणे :** पिंपळे गुरव येथील एक्सीलेंट जूनियर प्री स्कूल शाळेचा वार्षिक क्रीडा दिन नुकताच २ एन स्पोर्ट्स अँड फिटनेस” च्या क्रीडांगणावरती उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये बालचमुंनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपल्या खेळांचे सुंदर प्रदर्शन दाखवले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यस्तरीय कबड्डीपटू डॉ.शंकर कुंजीर व महिला क्रिडा पत्रकार पूनम काटे-कलापुरे कलापुरे उपस्थित होत्या. खेळाचे महत्व सांगताना पाहुणे म्हणाले की, लहान मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मैदानी खेळ खेळले पाहिजेत.खेळांमुळे मुलांमध्ये सांघिक भावना निर्माण होते.

# क्रिशु नाईट्स संघाला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** तिसऱ्या क्रिकिंगडम चॅम्पियन्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत प्रणव दवे(६-७) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर क्रिशु नाईट्स संघाने सिंगापूर थंडरबोल्ट संघाचा २३ धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले.

वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना क्रिशु नाईट्स संघाचा डाव २४.४ षटकात सर्वबाद १०४ धावावर संपुष्टात आला. यात प्रणव दवे २२, साईहरी वेंकटरमण ८ यांनी धावा केल्या.सिंगापूर थंडरबोल्टकडून रेवांत सहाय (३-२१), ग्लेन सी (२-७), पार्थ मानहस (१-१०) यांनी सुरेख गोलंदाजी केली. याच्या उत्तरात सिंगापूर थंडरबोल्ट संघ २०.१ षटकात सर्व बाद ७२ धावावर संपुष्टात आला. यात अनिरुद्ध आनंदतिर्थन १६, रेवांत सहाय १८ यांनी थोडासा प्रतिकार केला. क्रिशु नाईट्स संघाकडून प्रणव दवेने भेदक गोलंदाजी करत ७ धावात ६ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याला साईहरी वेंकटरमणने ८ धावात २ गडी, तर संस्कार सुक्कलने २८ धावात १ गडी बाद करून साथ दिली.

३ऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत अजित सिंग (४-२०) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर डीपीएस डायनामोज संघाने ओडीएम ग्लॅडिएटर्स रांची संघाचा २३ धावांनी पराभव करून तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली.

## जिल्हास्तरीय बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत
# कृष्णा, अजिंक्य, अनन्या, विहा, अद्वैत यांचा अंतिम फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जिल्हास्तरीय बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत कृष्णा जासुजा, अजिंक्य चव्हाण, अनन्या गाडगीळ, विहा गुरव, अद्वैत फेरे यांनी आपापल्या गटांतील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत पुरुष गटात बिगर मानांकित कृष्णा जासुजाने दुसऱ्या मानांकित सुजल लखारीचा १०-१५, १५-९, १५-६ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. महिला गटात अव्वल मानांकित अनन्या गाडगीळने इंदिरा पाचारणेचा १५-११, १५-६ असा तर, दुसऱ्या सामन्यात श्रेया शेलारने पायल पाटीलचा १५-४, १५-८ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. ९ वर्षाखालील मुलांच्या गटात अजिंक्य चव्हाणने दुसऱ्या मानांकित अथर्व जगदाळेचा १५-८, १७-१५ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. याच मुलींच्या गटात बिगर मानांकित विहा गुरवने अव्वल मानांकित राजलक्ष्मी थेऊरकरचा १५-१३, १४-१६, १५-१० असा संघर्षपूर्ण पराभव केला. चौथ्या मानांकित कियारा साखरेने दुसऱ्या मानांकित अन्वी कुलकर्णीवर १५-८, १५-५ असा. विजय मिळवला.11 वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित अद्वैत फेरेने चौथ्या मानांकित आरुष सप्रेवर १५-११, ११-१५, १५-८ असा विजय मिळवला.